




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com


**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**




• वर्ष : ०३ • अंक : ०९२ • पुणे • रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा २१ डिसेंबर रोजी 'संकल्प मेळावा'

## केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह मित्रपक्षाचे नेते करणार मार्गदर्शन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर पालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ते, पदाधिकारी तसेस मनपा निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांमध्ये निवडणूकीचे उत्साहवर्धक वातावरण निर्माण करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्यावतीने 'संकल्प मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा संकल्प मेळावा २१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वा. अहिल्या आश्रम मैदान, डॉ बाबासाहेब आवेडकर महाविद्यालय, नाना पेठ, पुणे येथे होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.




यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, अशोक कांबळे, अशोक शिरोळे, महेंद्र कांबळे, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, महिला शहराध्यक्ष हिमाली कांबळे, मोहन जगताप, बाबूराव घाडगे, भगवान गायकवाड, वसंत बनसोडे, डॉ. कपिल जगताप, रोहित कांबळे, निशांत सोनवणे आदि उपस्थित होते.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली मेळावा संपन्न होणार आहे. या मेळाव्यात मित्र पक्षाचे केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि महायुतीतील सर्व आमदार या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. रिपब्लिकन पक्षाचे केंद्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरोदे हे पक्षाचे प्रमुख नेते मेळाव्याकरीता उपस्थित राहणार आहेत,

मेळावा यशस्वी होण्यासाठी निरनिराळया समित्या गठीत केल्या आहेत पुणे शहरातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात व शाखामध्ये बैठका घेणे सुरु आहे, त्याचप्रमाणे अहिल्या आश्रम मैदान, डॉ. बाबासाहेव आंबेडकर महाविद्यालय, नानापेठ, पुणे येथील मैदानावर स्टेज, मंडप, पार्किंगची जय्यत तयारी चालू केली आहे.

निवडणूक प्रकिया अंतर्गत इच्छुक उमेव्दारांकरीता ११ ते १३ डिसेंबर २०२५ पर्यंत फॉर्म वाटप व स्विकृत्ति ठेवली आहे. मागील महापालिका निवडणूका भाजपा - आरपीआय महायुतीच्या वतीने लढविल्या गेल्या होत्या त्यामध्ये आरपीआयचे पाच नगरसेवक निवडून आले होते, महापालिकेत महायुतीच्या माध्यमातून रिपब्लिकन पक्षाला वेगळा गट म्हणून मान्यता देण्यात आली होती त्यानुसार वेगळे ऑफिस देण्यात आले होते, पाच वर्षाच्या कालावधीमध्ये तीन नगरसेवकांना उपमहापौर पदे देण्यात आली पक्षाला दोन प्रभाग समितीचे अध्यक्ष पदे व स्थायी कमिटी सदस्स पद मिळाले, महायुतीच्या सत्तेच्या माध्यमातून महापालिकेच्या प्रवेशव्दारावर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्थ पुतळा बसविण्यात आला, या सर्व सकारात्मक बाबींचा विचार करुन पुन्हा आगामी निवडणूक महायुतीच्या बरोबर लढण्याचे पक्षाने ठरविले आहे त्याकरीता भाजपाकडे २० जागांची मागणी केलेली आहे, या निवडणुकीमध्ये मध्ये रिपबिरुकन पक्षाचे दोन आकडी नगरसेवक निवडून आणण्याचा संकल्प या मेळाव्यात करण्यात येणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

# दरोड्याच्या तयारीतील सहा आरोपी पोलीसांच्या जाळ्यात

**रांजणगाव-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

MIDC परिसरातील बंद पडलेल्या कंपनीत चोरीच्या तयारीत असलेल्या सहा जणांना रांजणगाव MIDC पोलिसांनी मध्यरात्री शिताफीने पकडत मोठी कारवाई केली. रात्री 11 वाजण्याच्या सुमारास डायल 112 वर एका सिक्युरिटी गार्डने फोन करून माहिती दिली की, बंद कंपनीत काही चोरट्यांनी घुसखोरी केली असून त्यांच्या हातात दांडे व टिकावसारखी हत्यारे आहेत. माहिती मिळताच पोलीस कॉन्स्टेबल संतोष आडसुळ यांनी तत्काळ ही माहिती पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांना कळविली.




घटनेचे गांभीर्य ओळखत त्यांनी तपास पथकाला त्वरित घटनास्थळी रवाना होण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार उपनिरीक्षक अविनाश थोरात, सहा. फौज. दत्तात्रय शिंदे, पो.हवा. विलास आंबेकर, पो.कॉ. उमेश कुतवळ यांनी घटनास्थळी धाव घेतली.

सिक्युरिटी गार्डकडून चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, गुजरात नंबरची गाडी कंपनीसमोरील परिसरात संशयास्पदरीत्या फिरत होती. चोरट्यांनी त्याला पाहताच कारसह पळ काढला.

त्यानंतर पोलिसांनी खाजगी वाहनातून शोधमोहीम सुरू केली. खंडाळा माथा परिसरात नगर–पुणे महामार्गावरील हॉटेलजवळ गुजरात पासिंगची संशयित वॅगनर कार (GJ 36 L 5891) दिसली. पोलिसांचे दर्शन होताच हे इसम पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले; मात्र पथकाने शिताफीने त्यांना ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या सहा व्यक्तींची नावे पुढीलप्रमाणे: 1. सुरेशभाई प्रभुभाई धामेचा 2. जितेंद्र दिनेश डाभी 3. मेहल सुरेशभाई धामेचा 4. भरतभाई देवजीभाई सोलंकी 5. उत्सव जितेंद्रभाई डाभी 6. भरतभाई जिवराजभाई कोळी (सर्व रा. मोरबी–2, इंदिरानगर, थाना बी-डिव्हिजन, मोरबी, गुजरात) त्यांच्या मोबाईलची पाहणी केली असता बंद पडलेल्या कंपनीचे फोटो आढळून आले. तसेच पंचांसमक्ष वाहनाची तपासणी करताना दरोड्यासाठी लागणारे साहित्य, टिकाव, लोखंडी चाकू आणि अन्य हत्यारे मिळून आली.

कौशल्यपूर्ण चौकशीदरम्यान आरोपींनी कबुली दिली की, बंद पडलेल्या MIDC कंपनीत स्क्रॅप व मातीतील मौल्यवान धातू मिळू शकतात या संशयावरून ते चोरी करण्यासाठी आले होते.

या प्रकरणी दरोडा व चोरीची तयारी या गुन्ह्यांतर्गत सात आरोपींवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली असून, मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, शिरूर कोर्टाने दि. 12 डिसेंबर 2025 पर्यंत पोलिस कोठडी मंजूर केली आहे.

ही कारवाई मा. संदीप गिल्ल (पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण), मा. रमेश चोपडे (अप्पर पोलीस अधीक्षक) आणि श्री. प्रशांत ढोले (उपविभागीय पोलीस अधिकारी, शिरूर) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, उपनिरीक्षक अविनाश थोरात, सहा. फौज दत्तात्रय शिंदे, पो.हवा. विलास आंबेकर, पो.कॉ. उमेश कुतवळ, पो.हवा. माणिक काळकुटे, अजित पवार, पो.कॉ. केशव कोरडे, संदीप भांड, पो.कॉ. दळवी यांचे विशेष योगदान आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ९३ वर्षांच्या रुग्णाची आव्हानात्मक मूत्रविज्ञान शस्त्रक्रिया यशस्वी

**पिंपरी, पुणे / भोसरी (आरंभ पर्व) : मेडिकव्हर KLE हॉस्पिटल, पिंपरी येथे 93 वर्षीय पद्माकर दिनकर उबाळे यांच्यावर यशस्वीरीत्या एक अतिशय गुंतागुंतीची मूत्रविज्ञान शस्त्रक्रिया करण्यात आली. तब्बल 50 वर्षे वाढत असलेला आणि तब्बल 1.6 किलो वजनाचा स्क्रोटल मास काढण्यात डॉक्टरांना यश मिळाले असून, रुग्णाला उपचारानंतर सुरक्षितरीत्या डिस्चार्ज देण्यात आला आहे. उबाळे यांना 23 नोव्हेंबर 2025 रोजी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. जवळपास 50 वर्षांपासून हळूहळू वाढत चाललेल्या स्क्रोटल सूजेसह दोन्ही पायांमध्ये सूज व वारंवार लघवी होण्याची तक्रार ते करत होते. तपासणीदरम्यान उजव्या बाजूला 20x20x15 सेंमी एवढा मोठा स्क्रोटल मास आढळला, ज्याचे वजन अंदाजे 1.6 किलो होते. त्यासोबत हायड्रोसील-हेमॅटोसील आढळले. रुग्णाला COPD आणि हायपरटेन्शनचा देखील इतिहास होता.**



### मुख्यमंत्री फडणवीस यांची डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली सदिच्छा भेट

**नागपूर (आरंभ पर्व) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रामगिरी निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या निमित्ताने डॉ. गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पुष्पगुच्छ, शाल आणि भगवान जगन्नाथांची प्रतिमा देऊन शुभेच्छा दिल्या. भेटीदरम्यान राज्यातील विविध सामाजिक उपक्रम, लोककल्याणाशी संबंधित मुद्दे आणि वर्तमान घडामोडींवर सद्भावपूर्ण वातावरणात चर्चा झाली. आगामी योजनांवरील सहकार्य आणि समन्वयाबाबतही सकारात्मक संवाद साधला गेला.**



### नऱ्हेगावमध्ये भव्य रक्तदान शिबिरात ३६७ जणांचे रक्तदान

**पुणे (आरंभ पर्व) : नऱ्हेगाव येथे पुण्यनगरीचे खासदार तसेच केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधर आण्णा मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विरांश युथ फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. कोमल सतीशभाऊ कुटे व नऱ्हेगाव ग्रामपंचायत सदस्य तथा माजी उपसरपंच मा. सतीशभाऊ प्रभाकर कुटे यांच्या पुढाकाराने तसेच संजीवन ब्लड बँकेच्या संयोजनाने आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ३६७ रक्तदात्यांनी स्वखुशीने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या प्रसंगी खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. भिमराव आण्णा तापकीर, जि. प. सदस्या जयश्री ताई भुमकर, जि. प. सदस्या जयश्री ताई पोकळे, भाजप ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष मा. सागर भुमकर, माजी नगरसेवक राजाभाऊ आप्पा लायगुडे, मंडल अध्यक्ष मा. यशवंत (बापू) लायगुडे, युवा मोर्चा अध्यक्ष सारंग दादा नवले, युवा सेना जिल्हा प्रमुख मा. सोमनाथ भाऊ कुटे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. भुकुम गावच्या सरपंच सौ. सुवर्णताई रामदास आंग्रे, तंटामुक्ती अध्यक्ष रामदास आंग्रे, संतोष शेठ ढवळे, नऱ्हेगावच्या माजी उपसरपंच सौ. चैत्राली कुटे, ग्रामपंचायत सदस्य प्रदीप कुटे, प्रवीण नाना कुटे, प्रभाकर कुटे, सुरेश कुटे, शिवाजी कुटे, सोपान कुटे, शरद कुटे, समीर कुटे, राजू कुटे, सौरभ आंग्रे, मंगेश लवांडे, योगेश कोंढरे, अमर भडावळे, जीवन कुटे, आकाश कुटे, विकास कुटे, विलास कुटे, रमेश कुटे, बाळासाहेब खेडेकर, प्रकाश खेडेकर, ग्रा. पं. सदस्य आकाश शेठ वाल्हेकर, सुनील आप्पा वाल्हेकर, नामदेव वाल्हेकर, जनार्दन भुमकर, सत्यवान भुमकर, विजय भुमकर, विशाल भुमकर आणि इतर मान्यवरांनीही उपस्थित राहून रक्तदात्यांचे कौतुक केले.**

# नविन रेशन कार्ड देण्यासाठी पुरवठा निरीक्षकाची लाचखोरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नविन रेशन कार्ड मंजूर करून देण्यासाठी १९ हजार रुपयांची लाच मागून तडजोडीनंतर १६ हजार रुपये स्वीकारणाऱ्या नागरी अन्नधान्य पुरवठा विभागाच्या परिमंडळ अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात अटक केली आहे. ही कारवाई गुरुवारी (दि. ११ डिसेंबर) भोसरी येथील अन्नधान्य वितरण कार्यालयात करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव गजानन अशोकराव देशमुख (वय ३६, वर्ग-२), परिमंडळ अधिकारी, अन्नधान्य वितरण कार्यालय 'फ' झोन, भोसरी, पुणे, असे आहे. ते धनकवडी येथील तळजाई पठार परिसरात वास्तव्यास आहेत. एसीबीकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे अपंग असून समाजकार्य करतात. शासकीय कामकाजाची माहिती असल्याने ते मित्र व ओळखीच्या व्यक्तींना नवीन रेशन कार्ड काढण्यासाठी मदत करीत होते. या प्रक्रियेत तक्रारदाराकडे १४ जणांनी अधिकारपत्र देऊन प्रत्येकी ५० रुपये शासकीय शुल्क दिले होते. तक्रारदाराने सर्व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करून ऑनलाईन शुल्क भरले, त्यानंतर १४ रेशन कार्डसाठी 'एन' क्रमांकही प्राप्त झाले. यानंतर तक्रारदार भोसरी येथील पुरवठा निरीक्षक देशमुख यांना भेटले असता, त्यांनी प्रत्येक रेशन कार्डसाठी ९०० रुपये प्रमाणे एकूण १२,६०० रुपये देण्याची मागणी केली. ही रक्कम शासकीय शुल्काव्यतिरिक्त असल्याने ती लाच असल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने १० डिसेंबर रोजी एसीबीकडे तक्रार दाखल केली.

# विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी येणाऱ्या अनुयायांना सोईसुविधा उपलब्ध करुन द्या : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

## विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सहकार्य करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पेरणे फाटा येथे १ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येणारा विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रम सर्व संबंधित शासकीय यंत्रणानी विविध संघटनांना विश्वासात घेवून यशस्वी करावा, अनुयायांची कोणतीही गैरसोय होणार नाही याद्दष्टीने जिल्हा प्रशासनाने नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या. अनुयायांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात येतील, अशी ग्वाही जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध संघटनांसोबत आयोजित बैठकीत



ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पुणे शहर पोलीस उपआयुक्त सोमय मुंढे, पुणे ग्रामीण पोलीस अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी चंद्रकांत वाघमारे, पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे, हिम्मत जाधव, समाज कल्याण उपायुक्त वंदना कोचुरे, सहाय्यक आयुक्त तथा बार्टीचे निबंधक विशाल लोंढे, यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. श्री. डुडी म्हणाले, विजस्तंभास अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना पिण्याचे पाणी, वापराचे पाणी, स्वच्छतागृह, वाहनतळ, दिशादर्शक फलके, वाहतूक व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, औषधोपचार सेवा, ड्रोन्, सीसीटिव्ही, पुस्तकालय आदी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. अनुयायांची कोणताही प्रकारची गैरसोय होणार नाही, याबाबत जिल्हा प्रशासन दक्षता घेत आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने काही सूचना असल्यास प्रशासनाला कळवाव्यात, त्याचा यावर्षीचा नियोजनात समावेश करण्यात येईल.

# महिलांचा बुलंद आवाज : मा. सौ. तृप्तीताई देसाई

## वाढदिवस विशेष

**(दै. आरंभ पर्व)**

**महाराष्ट्रात महिला सबलीकरणाची चळवळ नवे वळण घेऊ लागली त्या काळात आपल्या धैर्याने, चिकाटीने आणि ठाम भूमिकेने समाजाचे लक्ष वेधून घेणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्तीताई देसाई. महिलांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, समाजातील रूढी-परंपरा व अंधश्रद्धांविरुद्ध लढा देणे आणि महिलांच्या सन्मानासाठी रस्त्यावर उतरून लढण्याची त्यांची शैली खास आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे कार्य विशेष अधोरेखित करावेसे वाटते.**





### शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

**महिलांच्या हक्कांसाठी ठाम भूमिका :** तृप्तीताई देसाई यांनी महिलांना समान सामाजिक, धार्मिक आणि कायदेशीर हक्क मिळावेत यासाठी सातत्यपूर्ण आंदोलनांची परंपरा निर्माण केली.

मंदिरप्रवेशाचा प्रश्न असो, अत्याचारित महिलांना न्याय मिळवून देणे असो, की समाजातील दबलेले आवाज बुलंद करणे असो-तृप्तीताई अग्रभागी उभ्या राहिल्या.

**अन्यायाविरुद्ध कठोर लढा :** त्यांच्या नेतृत्वाखाली भूमाता ब्रिगेडने अनेक ठिकाणी महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसा, लैंगिक शोषण, दारूबंदी आणि सामाजिक कुप्रथांविरुद्ध जोरदार मोहीमा राबवल्या.

तृप्तीताईंचा संघर्षातील आक्रमक पण नेमका दृष्टिकोन समाजाला नव्या दिशेची जाणीव करून देतो.

**समाजमनाला भिडणारी थेट भाषा :** तृप्तीताईंचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची स्पष्टवक्ता आणि बिनधास्त भूमिका. "अन्याय सहन करणेही अन्यायच आहे," हा संदेश त्या आपल्या उपक्रमातून सातत्याने देत आल्या आहेत. त्यामुळे महिलांमध्ये एक वेगळा आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम त्यांनी यशस्वीपणे केले.

**जनजागृती आणि संघटन बांधणी :** शहरी भागासह ग्रामीण आणि आदिवासी भागात जाऊन त्यांनी महिलांना न्याय, कायदे, हक्क आणि स्वसंरक्षणाबद्दल माहिती दिली. त्यांमुळे हजारो महिलांना संघटित होण्याची संधी मिळाली.

भूमाता ब्रिगेड ही आज राज्यात महिलांच्या प्रश्नांवर प्रभावी आवाज बनली आहे.

**सामाजिक सुधारणा चळवळीचे बळ :** तृप्तीताई या केवळ आंदोलनकर्त्या नाहीत; त्या समाजातील परिवर्तनाला दिशा देणाऱ्या सुधारकही आहेत.

महिलांना शिक्षण, स्वावलंबन आणि रोजगाराच्या संधी देण्यासाठी त्या सातत्याने सरकार, प्रशासन आणि समाज यांच्याशी संवाद साधत असतात.

महिलांसाठी सुरक्षित, सन्मानित आणि समानतेवर आधारित समाज घडविण्याच्या त्यांच्या संकल्पपूर्तीला सर्वजण शुभेच्छा देत आहेत.

तृप्तीताई देसाई यांचे कार्य हे आधुनिक महाराष्ट्रातील महिला सबलीकरणाच्या चळवळीतील एक प्रभावी पाऊल आहे. त्यांची धैर्यवान लढाई, नेतृत्वशैली आणि न्यायासाठीची तळमळ समाजाला प्रेरणा देणारी आहे.

**आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!**






दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक


• वर्ष : ०३ • अंक : ०९२ • पुणे • रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313


## ठळक बातम्या

### CBSE मध्ये शिवरायांचे २१ पाने

पुणे (आरंभ पर्व) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. त्यांनी सांगितले की, 'आता सीबीएसईनी नवीन पुस्तकांमधे या ठिकाणी छत्रपती शिवरायांचा आणि मराठा साम्राज्याचा २१ पानांचा इतिहास घेतलेला आहे.' पूर्वी मुघलांचा इतिहास १७ पानांचा तर मराठा साम्राज्याचा केवळ एक परिच्छेद होता, असेही ते म्हणाले. यासोबतच, २०३० पर्यंत महाराष्ट्र देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपले दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला जो मार्ग दाखवला, त्यांच्या तत्त्वाने आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या मार्गाने महाराष्ट्र चालत राहील. छत्रपती शिवरायांचं तत्त्व महाराष्ट्राला मान्य होतेच, पण देशपातळीवर त्याबाबत अनेक संभ्रम होते. सीबीएसईच्या पुस्तकांमध्ये मराठा साम्राज्यावर, हिंदवी साम्राज्यावर फक्त एक परिच्छेद होता. पण मुघलांचा इतिहास 17 पानांचा होता. पण आता हा इतिहास बदला आहे. आता सीबीएसईने छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याचा 21 पानांचा इतिहास अभ्यासक्रमात केंद्र सरकारने समाविष्ट केला आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ते विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावर झालेल्या चर्चेला उत्तर देत होते.

### सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलावर पुन्हा दोन कोटींचा खर्च

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल चौक ते फन टाइम थिएटर यादरम्यान नव्याने उभारण्यात आलेला उड्डाणपूल नियोजित मेट्रो मार्गासाठी ६६ ठिकाणी फोडला जाणार आहे. हे काम पुढील काही महिन्यात सुरू होण्याची शक्यता असताना, या उड्डाणपुलाच्या विद्युतरोषणाईसाठी १ कोटी ८० लाखांचा खर्च करण्याचा घाट पुणे महापालिकेच्या विद्युत विभागाने घातला आहे. या प्रस्तावाला महापालिकेच्या स्थायी समितीने नुकतीच मंजुरी दिली आहे. सिंहगड रस्ता (नरवीर तानाजी मालुसरे रस्ता) परिसरातील वडगाव, धायरी, नऱ्हे, खडकवासला या गावांचा झपाट्याने विकास होत आहे. शिवाय, सिंहगड, खानापूर, पानशेत या परिसरातूनही शहरात ये-जा करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मात्र, सिंहगड रस्त्याला दुसरा पर्यायी मार्ग नसल्यामुळे दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढत आहे.

# श्वान-मांजर पाळताय?

## परवाना नसेल तर आता महापालिका करणार कारवाई!



**परवाना कसा काढायचा?**

महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध ऑनलाइन अर्जामध्ये खालील माहिती द्यावी लागते –
रहिवासी क्षेत्र व इमारतीचे नाव
मालकाचे नाव, ई-मेल आयडी
पाळीव प्राण्याचे नाव, रंग, वजन, लिंग
रेबीज लसीकरणाचा तपशील
पाळीव प्राण्याचे छायाचित्र
शुल्क भरण्याची स्थिती
ऑनलाइन सुविधा असल्याने घरबसल्या परवाना मिळवणे सोयीचे आहे.

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

पिंपरी-चिंचवडमध्ये श्वान आणि मांजर पाळण्यासाठी परवाना घेणे बंधनकारक असतानाही नागरिकांचा प्रतिसाद अत्यल्प आहे. शहरात दहा हजारांहून अधिक नागरिकांकडे पाळीव प्राणी असतानाही केवळ ८१७ जणांनी श्वान आणि ३२ जणांनी मांजर पाळण्याचा परवाना घेतल्याची माहिती महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने दिली. त्यामुळे विना परवाना प्राणी पाळणाऱ्यांवर विशेष मोहिमेद्वारे दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

शहरात गेल्या दहा वर्षांत १ लाख ७० हजार ८४० नागरिकांना श्वानांनी चावा घेतला आहे. भटक्या श्वानांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेकडून निर्बीजीकरण मोहीम राबवली जाते. मागील पाच वर्षांत ४३ हजार ६८० भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण झाले आहे. शहरात सुमारे १ लाख भटके श्वान आणि त्यासोबतच पाळीव श्वानांचीही संख्या झपाट्याने वाढत आहे. परंतु अनेकजण आपल्या प्राण्यांची नोंदणी करत नाहीत. महापालिकेत प्रत्यक्ष येऊन परवाना काढण्यास नागरिक कचरतात, हे लक्षात घेऊन ४ ऑगस्ट २०२२ पासून ऑनलाइन परवाना सुविधा सुरू झाली. २०२३ मध्ये या माध्यमातून ६७१ नागरिकांनी परवाना घेतला. परवाना एक वर्ष वैध असून दरवर्षी त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. शुल्क ७५ रुपये आहे. रेबीज लसीकरण करणे परवानाधारकांसाठी बंधनकारक आहे. तसेच त्यांच्या प्राण्यांमुळे इतर नागरिकांना त्रास होणार नाही, याची जबाबदारीही त्यांचीच आहे. स्वच्छतेसंबंधी किंवा इतर तक्रारी आल्यास महापालिकेला परवाना रद्द करण्याचा अधिकार आहे. विना परवाना श्वान किंवा मांजर पाळल्यास ५०० रुपयांचा दंड आकारण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त संदीप खोते यांनी दिली. शहरात दहा हजारांहून अधिक प्राणीप्रेमी असून केवळ ८४९ जणांनीच अधिकृत परवाना घेतला आहे. त्यामुळे नियमबाह्य प्राणीपालन रोखण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे, असे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांनी सांगितले.




## महाराष्ट्रात १११ कोटींचा घोटाळा; कार्यकारी अभियंता निलंबित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ठेकेदारांच्या जमा असलेल्या डिपॉझिट रकमेमधून १११ कोटी रुपये अनधिकृतरित्या काढण्याचे प्रकरण आता जव्हार बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचेही अंगलट आलंय. या प्रकरणात कार्यकारी अभियंता नितीन भोये यांना निलंबित करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. तर यापूर्वी या प्रकरणात तीन आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. बांधकाम विभागातून चेक गहाळ होणे, सही खरी की खोटी, याबाबत अनेक संशयास्पद बाबी समोर आल्या होत्या. या प्रकरणात काही अधिकाऱ्यांचा सहभाग आहे का? असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे. यासंदर्भात नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशनात आमदार विजय वडेटीवार यांनी देखील प्रश्न उपस्थित केला होता. या सर्व बाबीच्या पार्श्वभूमीवर विशेष अधीक्षक तथा मुख्य अभियंता सामाजिक बांधकाम प्रादेशिक विभाग कोकण मशा कांबळे यांनी नितीन भोये यांच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत. दरम्यान, तूर्तास जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागाचा कार्यभार पालघर उपविभागाचे कार्यकारी अभियंता महेंद्र किनी यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपवण्यात आला आहे. जव्हारच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई मानली जात असून, कार्यकारी अभियंत्याचे निलंबन होण्याची ही पहिलीच घटना आहे.

याआधी सुद्धा या कार्यालयातील भ्रष्ट कारभाराबाबत अनेकदा अनेक प्रकरणे समोर आली आहेत. मात्र किरकोळ अधिकाऱ्यांच्या बदलीशिवाय मोठी कारवाई आजपर्यंत झालेली नव्हती. मात्र, गेल्या काही दिवसांत १११ कोटी रूपये अनधिकृतपणे काढण्याचा प्रकार, तसेच कामे सुरू होण्याआधीच बिले मंजूर केल्याचे आरोप समोर आल्याने जव्हार सार्वजनिक बांधकाम विभाग चर्चेत आला होता. त्याचीच प्रचिती म्हणून भोये यांचे निलंबन झाल्याचे बोलले जात आहे. मात्र आता या कारवाईमुळे, जवाहर बांधकाम विभागातील काही उपाभियंता, कनिष्ठ अभियंता यांचा यामध्ये समावेश तर नाही ना? हेही पाहणे आता गरजेचं ठरणार आहे. १११ कोटींच्या प्रकरणात ठेकेदार आणि त्यांनी ठेवलेल्या काही माणसांवर कारवाई झाल्यानंतर सुद्धा यामध्ये बड्या अधिकाऱ्यांच्या समावेशाबाबत सुद्धा संशय व्यक्त करणाऱ्यात आला होता. अधिवेशनात विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नात सुद्धा पत्रकारांनी केलेल्या बातम्यांचा आणि तक्रारीचा उल्लेख असल्याचे दिसून येत आहे. एकूणच ही कारवाई समाधानकारक असली तरी या मागील संपूर्ण कारभाराची उच्चस्तरीय चौकशी होऊन याआधी सुद्धा काम न करता बिले काढणे, चालू काम दाखवून पूर्ण रक्कम हडप करणे असे प्रकार झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे आता या प्रकरणाची सुद्धा तपास होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

## महापालिकेसाठी उद्या महाविकास आघाडीची बैठक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आगामी महापालिका निवडणूक महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकत्रित लढणार की स्वतंत्र याबाबत प्रश्नचिन्ह असतानाच सोमवारी काँग्रेस भवनमध्ये महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षाच्या नेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत महापालिका निवडणूक एकत्रित लढण्यासंदर्भात चर्चा केली जाणार आहे तसेच यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महाविकास आघाडीतील समावेशावरही चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक आयोगाकडून महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम राबवला जात आहे. पुढील काही दिवसांमध्ये निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्याची शक्यता आहे. तर, दुसरीकडे महाविकास आघाडी आणि महायुतीमधील घटक पक्षांकडून निवडणुकीची जय्यत तयारी केली जात आहे. महापालिका निवडणुकीत आघाडी आणि युती होणार का याबाबत तर्क-वितर्क लढवले जात आहेत. प्रत्येक पक्षाचे नेते आमची सर्व जागा लढवण्याची तयारी असल्याचे सांगत आहेत. महायुतीमध्ये भाजप व अजित पवारांची राष्ट्रवादी पुण्यात एकत्र लढणार नाही, हे जवळपास स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर दोन राष्ट्रवादी एकत्र लढण्याच्या चर्चेने जोर धरला होता. दुसरीकडे ठाकरेंची शिवसेना व मनसे एकत्र लढणार, अशीही चर्चा सुरू आहे. मनसेला महाविकास आघाडीत घेण्यासाठी काँग्रेसकडून विरोध असल्याने महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी अस्तित्वात राहणार का, असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, शरद पवारांच्या राष्ट्रवादीने महापालिका निवडणूक महाविकास आघाडीच्या माध्यमातूनच लढवण्याचे स्पष्ट केले आहे.

यानंतर आता उद्या सोमवारी (दि.१५) सकाळी १० वाजता काँग्रेस भवन येथे महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे प्रमुख नेते आणि पदाधिकारी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. बैठकीत महापालिका निवडणूक एकत्रित लढवण्याबाबतची भूमिका, संभाव्य जागावाटप, समन्वय समितीची रचना तसेच संयुक्त रणनीती आणि मनसेच्या समावेशाबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे.

## खेड तालुक्यातील मंदोशी येथे गॅस स्फोट

**खेड (दै. आरंभ पर्व)**

खेड (पुणे जि.) - मंदोशी (ता. खेड) येथील शांताबाई सिताराम गोडे यांच्या घरात मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास गॅसचा भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत त्यांचा पुतण्या लहू तुकाराम गोडे गंभीर जखमी झाला असून त्यांना उपचारासाठी स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रात्री थंडीमुळे शांताबाई गोडे, त्यांची सून जयश्री व नातू आरव घराबाहेर बसले होते. याच वेळी घरातून गॅसचा वास येत असल्याचे लक्षात आल्याने चौकशीसाठी लहू गोडे घरात गेले. मात्र, अचानक मोठा स्फोट होऊन घरात आग पसरली. स्फोटाची



तीव्रता इतकी होती की घरातील टी-अँगल असलेल्या छताची फरशी पूर्णपणे फुटली, तसेच वरच्या मजल्यावरील सिमेंट पत्रेही तुटली. वरच्या मजल्यावर दोन भरलेले गॅस सिलेंडर होते; मात्र, सुदैवाने त्यांचा स्फोट झाला नाही. त्या मजल्यावर राहणारे कुटुंब कामानिमित्त कल्याण येथे गेले असल्याने ते अपघातातून बचावले.

# भाजप उमेदवारीसाठी प्रचंड धांदल!

## ८०० जणांच्या मुलाखती; पक्ष कार्यालयात राजकीय रणकंदन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये उमेदवारीसाठी अभूतपूर्व चुरस पाहायला मिळत आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी तब्बल ८०० इच्छुकांच्या मुलाखती शनिवारी पक्षाच्या शहर कार्यालयात घेण्यात आल्या. उमेदवारीसाठीची धावपळ इतकी तीव्र होती की, पक्ष कार्यालयात राजकीय रणकंदनाचे वातावरण निर्माण झाले. रविवारी (१४ डिसेंबर)ही उर्वरित इच्छुकांच्या मुलाखती सुरू राहणार आहेत.

४१ प्रभागांमधून सुमारे अडीच हजार इच्छुकांनी भाजपकडून निवडणूक लढविण्यासाठी अर्ज भरले आहेत. या अर्जदारांच्या मुलाखती शनिवार-रविवार अशा दोन दिवसांत घेण्यात येत असून, पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी




राज्यमंत्री दिलीप कांबळे, महापालिका निवडणूक प्रभारी गणेश बीडकर आणि माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले यांनी मुलाखती घेतल्या.

मुलाखतीदरम्यान इच्छुकांनी प्रभागातील आतापर्यंतची कामगिरी, पक्षवाढीसाठी घेतलेली जबाबदारी, जनसंपर्क आणि जिंकण्याची क्षमता याबाबत सादरीकरण केले. काही नवख्या इच्छुकांना वरिष्ठांच्या थेट प्रश्नांमुळे घाम फुटला, तर अनुभवी इच्छुकांनी आत्मविश्वासाने उत्तरे देत नेतृत्वाचे लक्ष वेधून घेतले.

इच्छुकांची संख्या प्रचंड असल्याने प्रत्येकाला केवळ चार ते पाच मिनिटांचा वेळ देण्यात आला. जुन्या आणि अनुभवी पदाधिकाऱ्यांनाही मर्यादित वेळेतच आपली बाजू मांडावी लागली. मुलाखतीनंतर राजकीय वातावरण अधिकच तापले असून, काहींच्या चेहऱ्यावर उमेदवारी जवळ आल्याचा विश्वास दिसत होता, तर काहीजण चिंतेत दिसून आले.

उमेदवारी देताना ओळख, गटबाजी किंवा वरिष्ठता नव्हे, तर प्रभागातील काम, जनसंपर्क, संघटनात्मक ताकद आणि जिंकण्याची क्षमता या निकषांवरच अंतिम निर्णय होणार असल्याचे वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, भाजपकडून अर्ज करणाऱ्यांमध्ये माजी नगरसेवकांसह इतर पक्षांतील मान्यवरांचाही समावेश आहे. त्यांच्या अर्जांची छाननी सुरू असून, त्यांच्या मुलाखतीही लवकरच घेतल्या जाणार आहेत. मात्र, इतर पक्षांतून भाजपमध्ये प्रवेश करू इच्छिणाऱ्यांनी सर्वांसमोर मुलाखती नकोत, अशी भूमिका घेतल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.





जाहिरात म्हणलं की
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

आपल्या सर्व कायदेशीर आणि अधिकृत जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

आम्ही प्रकाशित करतो :
- वकील नोटीस
- कोर्ट नोटीस
- जाहिर नोटीस
- वाहन हस्तांतरण नोटीस
- बँकांचा ताळेबंद
- सर्वांना आवाहन करणाऱ्या जाहिराती
- ग्रामपंचायत जाहिराती

दै. आरंभ पर्व हे आपल्या जाहिराती योग्य वेळी व नियमांनुसार प्रसिद्ध करून देण्यासाठी वचनबद्ध आहे.

- विश्वासार्हता
- वेळेवर प्रकाशन
- कायदेशीर आवश्यकता पूर्ण

संपर्क : प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२ / ८६५७८६५७०२

दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५












### गोहे बुद्रुक ग्रामपंचायतीत

# ढिसाळ कारभाराचा कळस

- ग्रामसेवकांच्या चौकशीची मागणी तीव्र
- बीडीओचा वचक राहिला नाही? 'मी भित नाही' अशी ग्रामसेवकांची उर्मट भाषा; व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

**गोहे बुद्रुक-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

ग्रामपंचायतीत प्रलंबित कामांचा ढिगारा, कर्मचाऱ्यांची बेपर्वाई, अनियमित हजेरी आणि नागरिकांशी उर्मट वागणूक—या सर्व कारणांमुळे गोहे बुद्रुक ग्रामपंचायत सध्या वादग्रस्त ठरत आहे. ग्रामस्थांनी ग्रामसेवकांसह संबंधित कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण चौकशीची मागणी केली असून, "ही कसली सेवा? बीडीओचा वचकच उरला नाही का?" असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे.

ग्रामस्थांचा आरोप आहे की, पगार ग्रामपंचायतीचा घेत असताना कर्मचाऱ्यांची उपस्थिती मात्र ढिसाळ आहे. अनेक जण बाहेरील खासगी कामात गुंतलेले असून, नागरिकांची कामे वारंवार मागे ढकलली जात आहेत. शिवाय नागरिकांनी केलेल्या तक्रारींकडे सतत दुर्लक्ष करण्यात येत असल्याने ग्रामस्थांत नाराजी वाढली आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमुळे ग्रामसेवकांवरील आक्रोश आणखी तीव्र झाला आहे. "बीडीओना सांगा, मी घाबरत नाही," अशा शब्दांत नागरिकांशी वागणे ही प्रशासनाची भाषा असू शकत नाही, अशी टीका ग्रामस्थांनी केली.

"कारभार ढिसाळ असेल तर जबाबदार कोण? दोषी सापडल्यास पदाचा विचार न करता तात्काळ कारवाई झाली पाहिजे," अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजातील अनियमिततेमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. तातडीने लक्ष न दिल्यास गावपातळीवर आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# गोरक्षक असल्याचा दावा करत मारहाण

**वेल्हे (दै. आरंभ पर्व)**

गोरक्षक असल्याचा दावा करत बैल वाहतूक करणाऱ्या एका तरुणास अडवून त्याच्यावर बेदम मारहाण करत मोबाईल, वाहनाची चावी हिसकावणे, ऑनलाईन व्यवहारातून बीअर खरेदी करणे व ३० हजार रुपयांची खंडणी मागितल्याचा गंभीर प्रकार वेल्हे तालुक्यातील आस्कवडी परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी वेल्हे पोलीस ठाण्यात चार आरोपींसह सहा अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत केतन प्रविण वाघमोडे (वय २५, व्यवसाय शेती, रा. बरड बागेवाडी, ता. फलटण, जि. सातारा) यांनी फिर्याद दिली आहे. सदर घटना १२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० वाजण्याच्या सुमारास आस्कवडी फाटा येथे चिंतामणी राईस मिलसमोर वेल्हा–नसरापूर रस्त्यावर घडली. फिर्यादीनुसार, केतन वाघमोडे हे त्यांच्या कॅरी गाडी (एमएच-५३/बी-७०६६) मधून बैल घेऊन जात असताना आरोपी दादू लिम्हण व त्याच्या साथीदारांनी मोटारसायकल आडवी लावून गाडी थांबवली.

# मनसेची रणरागिणी सोनालीताई पोकळे पाटील

## पुणे महानगरपालिकेसाठी इच्छुक

### प्रभाग क्रमांक ३३ च्या विकासाचा बॅकलॉक भरून काढणार : पोकळे




**ड्रेनेज, रस्ते, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा अशा स्थानिक समस्यांवर ताईंनी वेळोवेळी पाठपुरावा करून उपाययोजना घडवून आणल्या. त्यामुळे त्या फक्त आंदोलन करणाऱ्या नव्हे तर प्रत्यक्ष काम करणाऱ्या नेत्या म्हणून नागरिकांत आदराने पाहिल्या जातात.**

**(दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खडकवासला भागात सर्वाधिक चर्चेत असलेले नाव म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रणरागिणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोनालीताई पोकळे पाटील. मनसेच्या विचारांची निष्ठेने जपणूक करणाऱ्या आणि अन्यायाविरुद्ध थेट लढण्याची धाडसी परंपरा कायम ठेवणाऱ्या ताईंनी पुणे महानगरपालिकेसाठी इच्छुक असल्याचे जाहीर करताच स्थानिक राजकारणात चैतन्य निर्माण झाले आहे. अभ्यासू, प्रामाणिक आणि जनतेत मिसळून काम करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ झाली आहे. सोनालीताई पोकळे पाटील या डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी तसेच कॉमर्स ग्रॅज्युएट असून त्यांचे शिक्षण आणि सामाजिक जाण या दोन्हींचा संगम त्यांच्या कार्यशैलीत स्पष्ट दिसतो. भोंग्याचा कर्कश्य आवाज, महिलांवरील अत्याचार किंवा टोल नाक्यांवरील वादग्रस्त वसुली अशा अनेक प्रश्नांवर ताईंनी स्वतःच्या अंगावर केस घेऊन ठाम लढा दिला आणि नागरिकांना न्याय मिळवून दिला. त्यामुळे मनसेच्या खडकवासला विभागात त्या धडाडीच्या आणि लोकाभिमुख नेत्या म्हणून परिचित आहेत.

मिशन महानगरपालिका सदरामध्ये सोनालीताई पोकळे पाटील यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी प्रभाग क्रमांक 33 मधील विविध समस्यांकडे लक्ष वेधले. ताईंनी सांगितले, "प्रभागातील अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबितच आहेत. किती दिवस झाले तरी पुणे महानगरपालिका प्रशासन डीम्म झाले आहे. या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. एक प्रभाग आकर्षित स्वरूपात निर्माण करण्याचा प्रयत्न करणार असून नागरिकांनी मला सहकार्य करावे. प्रभाग क्रमांक तिथीच्या विकासाचा बॅकलॉग पूर्ण करू. जनतेच्या विकासासाठी कटिबद्ध राहील असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. त्यावेळी त्यांनी केलेल्या त्यावेळी जनतेसाठी केलेल्या विविध कार्याची माहिती घेतली. त्यामध्ये प्रभागाशी असलेल्या या बांधिलकीची झलक ताईंनी केलेल्या कामांतून दिसून येते. अनेक ठिकाणी अस्वच्छ कचराकुंड्या स्वतः साफ करून तिथे व्यवस्थित बस स्टॉप उभारणे, स्थानिक नागरिकांना सुरक्षित आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही ताईंच्या कार्यशैलीची ठळक उदाहरणे आहेत. युवकांना संस्कार, दिशा आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी "राजगर्जना वाद्य पथक ट्रस्ट" ची स्थापना केली. महान नेत्यांच्या जयंतीच्या दिवशी डीजेवर नाचण्याऐवजी देशभक्ती, शिस्त आणि हिंदुत्वाचा संदेश देणारे वाद्यपथक उभे करणे हा ताईंचा अभिनव उपक्रम ठरला. या पथकामुळे प्रभागातील अनेक तरुणांमध्ये सकारात्मक बदल झाल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येते. सामाजिक बांधिलकीच्या कामात ताई नेहमीच पुढे असतात. आतापर्यंत 5000 हून अधिक वृद्धांना मोफत चष्मे वाटप करणे, महिलांसाठी कौशल्याधारित रोजगारनिर्मिती उपक्रम राबवणे, तसेच गरजू नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी सातत्याने धावपळ करणे ताईंच्या कार्याचा हा महत्त्वपूर्ण भाग आहे. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा थकलेला बोनस आणि पगार मिळवून देण्यासाठी आंदोलन करून प्रशासनाला जागे करणे हेही त्यांचे धाडस दाखवणारे मोठे पाऊल होते.

**सोनालीताईंची विशेषता म्हणजे त्यांनी कधीही निवडणुकीचे लक्ष्य ठेवून काम केले नाही. "जनतेचे प्रश्न हेच माझे ध्येय" या भावनेतून त्यांनी कार्य केले आहे. त्यामुळेच आज त्यांच्या इच्छुक उमेदवारीला प्रभाग 33 मध्ये व्यापक पाठिंबा उमटत आहे. मनसेच्या नेतृत्वाखाली प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्या सक्षम, धडाडीच्या आणि कटिबद्ध नेत्या म्हणून पुढे येत आहेत. आगामी पुणे महानगरपालिकेमध्ये त्यांच्यासारख्या कार्यतत्पर डॅशिंगबाज नेत्या "नगरसेविका" झाल्यास प्रभागाचा निश्चितपणे कायापालट होईल अशी आशा व्यक्त होत आहे.**






## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रभाग ३३ साठी काकासाहेब चव्हाण यांचा पक्षाकडे इच्छुक उमेदवारी अर्ज

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिका निवडणूक पुढील आठवड्यात लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे रणधुमाळीस सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षही निवडणुकीच्या दृष्टीने तयारी करत आहे. प्रभाग क्रमांक ३३ खडकवासला शिवने धायरी पार्ट मधून माजी नगरसेवक काकासाहेब उर्फ सोपान चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. समाविष्ट गावांचा असलेला या प्रभागामध्ये विकास करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे काकासाहेब चव्हाण यांनी यावेळी सांगितले. यावेळी बोलताना त्यांनी विजयाचा विश्वास व्यक्त केला.. ह्या प्रभागातील मतदार हा कायमच शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचाराचा आहे. या प्रभागातून निश्चितपणे पक्षाचे व महाविकासा आघाडीचे उमेदवार विजयी होतील असे विश्वासही व्यक्त केला आहे.

### निवृत्तीचे वय उलटले तरी ग्रामपंचायतीत कर्मचारी कार्यरत

- जिल्हा परिषदेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

पुणे ग्रामीण-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : पुणे जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींमध्ये निवृत्तीचे वय पूर्ण होऊनही कर्मचारी सेवेत कायम असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतरही संबंधित कर्मचारी काम करत असून, विशेष म्हणजे त्यांचा पगार थेट जिल्हा परिषदेकडूनच अदा केला जात असल्याचा आरोप होत आहे. नियमानुसार ग्रामपंचायत व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय निश्चित असताना, त्या नियमांना बगल देत काही ठिकाणी कर्मचारी वर्षानुवर्षे सेवेत ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे तरुण बेरोजगारांच्या नोकरीच्या संधी हिरावल्या जात असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणामुळे जिल्हा परिषदेतील संबंधित विभागाच्या देखरेखीवरही शंका व्यक्त केली जात आहे. वयाची मर्यादा ओलांडलेले कर्मचारी सेवेत कसे ठेवले जात आहेत? त्यांना सेवा वाढ कोणाच्या आदेशाने देण्यात आली? आणि नियमबाह्य पगार अदा करण्यास जबाबदार कोण? असे अनेक सवाल उपस्थित झाले आहेत. नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात येत आहे. तसेच नियमबाह्यपणे दिलेला पगार वसूल करून संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवामुक्त करावे, अशी मागणीही जोर धरू लागली आहे. प्रशासनाकडून यावर अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नसली, तरी या प्रकरणाने जिल्हा परिषदेच्या कारभारातील गंभीर त्रुटी पुन्हा एकदा उघड केल्या आहेत. "काही कर्मचाऱ्यांनी सेवेत टिकून राहण्यासाठी बोगस वयाचा दाखला सादर करून आपले वय कमी करून घेतले आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून संबंधित कर्मचाऱ्यांसह त्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांचीही सखोल चौकशी व्हावी," अशी मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

# सर्विस रस्त्याच्या विस्तारितकरणाला मंजुरी

**वारजे (दै. आरंभ पर्व)**

वारजे परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीला मोठा दिलासा देणारा निर्णय अखेर मंजूर झाला आहे. माईमंगेशकर हॉस्पिटल हायवे चौक ते पॉप्युलर नगरदरम्यानचा ६ मीटर (१८ फूट) रुंदीचा रस्ता वाहतुकीसाठी तयार करण्याच्या प्रस्तावाला पुणे महानगरपालिकेने मान्यता दिली असून या कामासाठी तब्बल 450 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. रस्त्याला अडथळा ठरणाऱ्या काही खाजगी मालमत्तांचे अंशतः हस्तांतरण, तसेच त्यासंबंधित तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अखेर हा महत्वाचा प्रकल्प पुढे सरकला आहे. वारजे परिसरात दररोज वाढणारी वाहतूक, अरुंद रस्ता आणि अपघातांचा धोका लक्षात घेता नागरिकांनी अनेकदा तक्रारी मांडल्या होत्या. या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक सचिन शिवाजीराव दोडके यांनीही सातत्याने पाठपुरावा करत मनपाच्या विविध विभागांशी बैठक घेऊन हा प्रस्ताव वेगाने मार्गी लावला होता. स्थळ पाहणी, नागरिकांशी संवाद आणि प्रशासनाशी समन्वय या सर्वांत त्यांची सक्रियता ठळकपणे दिसून आली.



रस्ता डांबरीकरण, वळण व्यवस्था, पाण्याच्या निःसारणाची सुविधा आणि सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक सुविधा उभारल्यानंतर हा मार्ग मोठ्या प्रमाणात सुकर होणार आहे. रुग्णालय परिसर, निवासी क्षेत्रे आणि व्यावसायिक भागांना जोडणारा हा महत्वाचा मार्ग विकसित झाल्यास वारजेकरांचा दैनंदिन प्रवास अधिक सुरळीत आणि सुरक्षित होईल.

"वारजेकरांच्या सोयीसाठी हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण व्हावा, यासाठी मी कटिबद्ध आहे," अशी प्रतिक्रिया सचिन दोडके यांनी दिली. हा निर्णय वारजे परिसराच्या विकासाला नवे गतीमान देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.






# यात्रा, सहल आणि वस्तूवाटपाचा सौदा की लोकशाहीचे मूल्य?

## निवडणुकीतील एका मताची किंमत नक्की किती?



### शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

**(दै. आरंभ पर्व)**

निवडणुकीचा काळ जवळ आला की गावोगाव एक विशिष्ट हालचाल सुरू होते. बाजारपेठेतील उत्साह वाढतो, चौकाचौकांत चर्चा रंगतात आणि समाजातील प्रत्येक स्तरावर राजकीय समीकरणांची कुजबुज सुरू होते. पण या सगळ्यांबरोबर एक अजून प्रवृत्ती शांतपणे डोके वर काढते—मतांच्या बदल्यात दिली जाणारी प्रलोभने. काही ठिकाणी यात्रांच्या सोयी, सहलींचे आमिष, भाजीपाला आणि किराणा वाटप, तर काही ठिकाणी अगदी भेटवस्तू किंवा पैसा देखील मतदारांच्या हातात पोहोचतो. त्यामुळे एक अस्वस्थ करणारा प्रश्न सतत मनाला टोचत राहतो—लोकशाहीतील एका मताची किंमत इतकी स्वस्त आहे का?

खरे पाहता, एखाद्या मतदाराचे एक मत म्हणजे केवळ एक आकडा नसतो. त्या एकमतामध्ये त्याचा विश्वास, अपेक्षा, अनुभव, आणि पुढील पाच वर्षांचे स्वप्न दडलेले असते. पण जेव्हा हेच मत वस्तूवाटपाच्या पिशवीत बसवले जाते, तेव्हा लोकशाहीची पायाभरणीच डळमळीत होते. एका पिशवीतील भाजीपाला एका दिवसाचा प्रश्न सोडवू शकतो, परंतु चुकीच्या हातात गेलेले मत संपूर्ण पाच वर्षांचा विकास अडवू शकते. सहलीच्या आमिषाने मिळणारा आनंद काही तास टिकतो, पण अनुत्तरदायी सत्ताधाऱ्यांची किंमत पिढ्या चुकवतात.

मत विकत घेण्याची ही पद्धत दुर्दैवाने दोन्ही बाजूंनी पोसली जाते. काही राजकारणी मताला बाजारातील वस्तूप्रमाणे मोजतात, तर काही मतदार तेच तत्त्व स्वीकारून क्षणिक फायद्यासाठी आपला निर्णय बदलतात. पण या व्यवहाराच्या मागे सर्वात मोठे नुकसान होते ते समाजातील जागरूकतेचे.

मतदान हा निर्णय विवेकाचा असावा, व्यवहाराचा नव्हे. निवडणूक म्हणजे सौदा नसतो; ती भविष्यासाठीची जबाबदारी असते. राजकारणी वचन देतात, काम करण्याचे आश्वासन देतात, पण मतदाराची भूमिका इथे अधिक महत्त्वाची ठरते—तो स्वतःला विचारतो का की गेल्या पाच वर्षांत माझ्या भागात काय घडले? मला दिलेली आश्वासने पूर्ण झाली का? ज्याला मी मत देतो तो खरोखरच जबाबदार आहे का?

या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची तयारी जिथे वाढते तिथे प्रलोभने आपोआपच कमी होऊ लागतात. जागरूक मतदार म्हणजे राजकीय स्वच्छतेची सुरुवात. जेव्हा मतदार वस्तूवाटपाकडे दुर्लक्ष करून कामावर आधारित मतदान करतो, तेव्हा लोकशाही अधिक मजबूत होते. अशा निर्णयांनीच पुढील पिढ्यांसाठी विकासाचा मार्ग मोकळा होतो.

निवडणुकीतील एका मताची किंमत कधीच यात्रेच्या तिकिटाएवढी किंवा भाजीपाला किटच्या किमतीएवढी नसते. एका मताची किंमत म्हणजे आपल्या गावाचा, आपल्या समाजाचा आणि आपल्या मुलांच्या भविष्यातील गुंतवणूक असते.

आज आपण विवेकाने मतदान केले, तर उद्याची व्यवस्था अधिक सक्षम, न्याय्य आणि पारदर्शक बनेल. वस्तूंमध्ये मताची किंमत मोजली जाणारी संस्कृती संपवायची असेल, तर प्रत्येक मतदारानेच आपल्या मताचा सन्मान करणे गरजेचे आहे.


कारण शेवटी लोकशाहीची खरी ताकद राजकारण्यांच्या हातात नसते; ती मतदाराच्या एका जागरूक निर्णयात असते.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ‘विन्नी की किताब’ – स्वतःची कहाणी धैर्याने पुन्हा लिहिणाऱ्या विन्नीची कथा

**मुंबई (आरंभ पर्व) : भारतातील अग्रगण्य हिंदी स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीवर 11 डिसेंबर 2025 पासून नवीन ओरिजिनल सीरिज ‘विन्नी की किताब’ स्ट्रीमिंगला सुरू होत आहे. सहा भागांच्या या धाडसी मालिकेत आलिशा पनवार नव्या रूपात दिसणार असून त्यांच्यासोबत अभिषेक कपूर, संजय गगनानी, मानसी जैन आणि अफरीन अल्वी यांसारखे कलाकारही झळकणार आहेत. कसोलच्या शांत आणि निसर्गरम्य वातावरणात घडणारी ‘विन्नी की किताब’ ही मालिका मालिका विन्नीची कथा सांगते. विन्नी ही एका छोट्या गावातील, शांत स्वभावाची मुलगी आहे. विन्नी तिच्या मनातील सगळ्या इच्छा आणि कल्पना एका खासगी डायरीत लिहित असते, आणि कधीच कल्पना करत नाही की यामुळे तिच्या आयुष्यात मोठा गोंधळ निर्माण होईल. पण जेव्हा तिचे अतिशय खाजगी विचार अनपेक्षितपणे जगासमोर उघड होतात, तेव्हा विन्नीसमोर एक मोठा निर्णय उभा राहतो- तो म्हणजे गप्प बसून सर्व सहन करायचे की आपली स्वतःची कहाणी परत मिळवण्यासाठी धैर्याने उभे राहायचे. इच्छा आणि सन्मान, लाज आणि धैर्य यांच्यामध्ये अडकलेली विन्नी स्वतःला समजून घेण्यासाठी एक नवा प्रवास सुरू करते. या प्रवासात ती समाजाच्या मतांना सामोरी जाते आणि स्वतःची कहाणी स्वतः सांगण्याचे धैर्य मिळवते. संजिव लांबा, एक्झिक्युटिव्ह प्रोड्युसर, हंगामा डिजिटल मीडिया, म्हणाले: "‘विन्नी की किताब’ वेगळी आहे कारण ती अशा आयुष्यांकडे प्रकाश टाकते, ज्यांकडे लोक सहसा दुर्लक्ष करतात. अनेक स्त्रिया त्यांच्या आत संपूर्ण विश्व लपवून ठेवतात. ही मालिका त्या आतल्या मनाच्या जगाला आणि त्यातून निर्माण होणाऱ्या निवडींना मोकळी जागा देते." विन्नीची भूमिका साकारणारी आलिशा पनवार म्हणते: "विन्नी ही माझ्यासाठी सर्वांत आव्हानात्मक भूमिका आहे. बाहेरून ती शांत आणि संयमी दिसते, पण आत तिच्या मनात भावनांचे आणि संघर्षाचे वादळ आहे. तिची शांतता, ताकद आणि बंडखोरपणा दाखवणे ही भूमिका साकारताना मला खूप प्रेरणा आणि समाधान मिळाले." विन्नीचा पती नवनीत नौटियालची भूमिका करणारा अभिषेक कपूर म्हणतो: "या मालिकेचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती दाखवते की शांत दिसणाऱ्या आयुष्यातही किती मोठे संघर्ष दडलेले असतात.**






## नवले पूल अपघातप्रश्नी प्रशासना विरोधात

# भूपेंद्र मोरे यांचे महामृत्युंजय आंदोलन !

**मोरे पोलिसांच्या ताब्यात : महामृत्युंजय आंदोलनाला यश : सोमवारी व मंगळवारी नवले पुलासंदर्भात जोरबैठका होणार**




- महामृत्युंजय आंदोलनाला यश नवले पुल प्रश्नावर उच्चस्तरीय बैठका निश्चित!



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील सतत वाढणाऱ्या अपघातांचा निषेध करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे यांनी पुन्हा एकदा कडाडून आवाज उठवला. मागील महिन्यात झालेल्या भीषण अपघातानंतर त्यांनी तिरडी आंदोलन, दशक्रिया आंदोलन अशी सलग आंदोलने केली तरीही प्रशासनाकडून केवळ वेगमर्यादा कमी करण्यापलीकडे कोणतीही ठोस कारवाई झाली नाही.

याच निषेधार्थ मोरे यांनी पूर्वघोषित ‘महामृत्युंजय आंदोलन’ आज प्रत्यक्षात राबवले.

नऱ्हेतील नागरिकांसह त्यांनी महामृत्युंजय रॅली काढली आणि अपघातस्थळी जेसीबी लावून प्रत्यक्ष रस्ता उखडण्याचा प्रयत्न केला. नागरिकांची प्रचंड गर्दी पाहून वातावरण तापले असताना सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे अधिकारी दाईंगडे यांनी कडक बंदोबस्त ठेवत मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांना ताब्यात घेतले.

रॅलीदरम्यान बोलताना भूपेंद्र मोरे म्हणाले, “मंत्री-आमदार सहा हजार कोटी खर्च करून हा रस्ता एलिव्हेटेड होणार असे सांगतात; पण ते होईपर्यंत दररोज जीव जात आहेत! स्वामीनारायण मंदिर ते वारजे पूल हा रस्ता संपूर्ण एलिव्हेटेड होईपर्यंत आणि अंतर्गत सर्विस रस्ते सुयोग्य बनवलेपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही.”

त्यांनी आणखी स्पष्ट केले की, “समाजाची वेदना समजून घेणारे लोकप्रतिनिधी या प्रश्नावर ठामपणे आवाज उठवायला हवाच. अपघात कमी करण्यासाठी प्रशासन ठोस भूमिका घेत नाही, तोपर्यंत माझी ही लढाई थांबणार नाही.”

मोरे यांच्या समर्थनार्थ नागरिकांनीही मोठी उपस्थिती दर्शवली. यावेळी त्यांच्या पत्नी नेहा मोरे, राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी, भूषण मोरे, हरीश वैद्य, लतिफ शेख, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर, सूरज दांगडे, सुशील भागवत, महेश घाडगे, सोनाली नायर,सोमनाथ शेडगे संजय सुर्वे अतिष चव्हाण गणेश निंबाळकर, मयूर गवळी  समीर अळकुंटे ,राहुल कोंडे,आनंद  थेऊरकर , प्रफुल भराडी, शेकर लोंढे ,अभिजित सावंत, रोहन जाधव ,संकेत चाचूर्डे,निखिल ढवळे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते.

मोरे यांना ताब्यात घेतल्यानंतर नऱ्हे पोलिस चौकीमध्ये एमएसईबी, NHAI आणि पोलिस यांची संयुक्त बैठक झाली. विविध मुद्द्यांवर चर्चा झाल्यानंतर मोरे यांना सोडण्यात आले. भूपेंद्र मोरे यांनी बाहेर येताच पुन्हा ठाम भूमिका मांडली ..

“ही जनसेवेची लढाई आहे. या रस्त्यावरून होणारे अपघात थांबवण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत लढत राहू.”

नवले पुल परिसरातील सातत्याने वाढणाऱ्या अपघातांविरोधात सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी सुरू केलेल्या महामृत्युंजय आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे. तिरडी आंदोलन, दशक्रिया आंदोलन आणि प्रतिकात्मक रस्ता खोदण्याच्या कृतीमुळे प्रशासन जागे झाले असून आता हा प्रश्न केंद्रस्तरावर गेला आहे.

15 डिसेंबर 2025 रोजी राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात सकाळी 11 वाजता महत्त्वपूर्ण संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत पुणे महानगरपालिका, पीएमआरडीए, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक पोलीस, स्थानिक नागरिक आणि पत्रकार उपस्थित राहणार आहेत. बैठक समन्वयक सुभाष घंटे यांनी सांगितले की, “पहिल्यांदाच स्थानिक नागरिकांना आपले मुद्दे अधिकृतपणे मांडण्याची संधी दिली जाणार असून, त्यावर आधारित प्रस्ताव केंद्राकडे पाठवला जाईल.”

याशिवाय, 16 डिसेंबर 2025 रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या विषयावर स्वतंत्र बैठक ही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून ठेवण्यास वेळ दिला आहे. एलिव्हेटेड रोड, सर्विस रोड सुधारणा आणि सुरक्षा उपायांसाठी निर्णायक निर्णय अपेक्षित आहेत.

भूपेंद्र मोरे यांच्या सातत्यपूर्ण संघर्षामुळे हा प्रश्न आता प्रशासनाच्या मुख्य अजेंड्यावर आला असून नागरिकांनी याला आंदोलनाचा मोठा विजय मानले आहे.

# सांगरुण गावात लोंबकळणाऱ्या विद्युत तारा

**ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण**



> **“महावितरण कंपनीच्या खानापूर कार्यालयाकडे तक्रार केली आहे. तुमच्या गावाची समस्या लवकर सोडवू व तिथे नवीन पोल व तारा लावू असे आश्वासन देण्यात आले होते; मात्र अद्यापही परिस्थिती जैसे थेच आहे.”**
> **— विकी अशोक मानकर (ग्रामस्थ, सांगरुण)**

**सांगरुण-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

मौजे सांगरुण येथे खांबावरील विद्युत तारा काही ठिकाणी इतक्या खाली लोंबकळत आहेत की हात पुरेल अंतर उरतो. या धोकादायक परिस्थितीबाबत महावितरणच्या खानापूर कार्यालयाकडे ग्रामस्थांनी अनेक वेळा तक्रारी केल्या; मात्र अद्यापही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



सांगण्यात येते की, सांगरुण गावात १९७० साली बसवलेले जुने पोल व तारा आज ५५ वर्षांनंतर पूर्णपणे जीर्णावस्थेत आले आहेत. त्यामुळे रात्री-अपरात्री तारा तुटून खाली पडण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. विद्युत तारा खाली लोंबकळत असल्याने ग्रामस्थांना जीव मुठीत घेऊन रात्रीच्या वेळी प्रवास करावा लागत आहे.

यामुळे मोठ्या वाहनांना अडथळे निर्माण होत असून सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यानही ग्रामस्थांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे समोर आले आहे.

ग्रामस्थांनी तातडीने महावितरण विभागाने या धोकादायक परिस्थितीवर उपाययोजना करून नवीन पोल व तारा बसवाव्यात, अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरत आहे.

# प्रभाग ३३ साठी अभिजीत धावडे यांनी मागितली उमेदवारी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत असलेल्या प्रभाग क्रमांक 33 खडकवासला–शिवणे–धायरी परिसरासाठी युवा व उत्साही नेते अभिजीत धावडे यांनी भाजपाकडे अधिकृतपणे उमेदवारी मागितली आहे.

भाजपाकडून इच्छुक कार्यकर्त्यांकडून उमेदवारी अर्ज मागविण्यात आले असून, त्यानुसार अभिजीत धावडे यांनी आपला अर्ज पक्षाकडे दाखल केला आहे. “मी भारतीय जनता पार्टीचा तळागाळातील कार्यकर्ता आहे. आमदार भीमराव तापकीर साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आजवर प्रभागासाठी सातत्याने काम केले आहे. माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यास जर पक्षाने संधी दिली तर प्रभागाचा विकास करण्यासाठी प्रामाणिकपणे आणि जिद्दीने काम करून दाखवू,” असा ठाम विश्वास अभिजीत धावडे यांनी यावेळी व्यक्त केला. अर्ज दाखल करताना भाजप पुणे शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, खडकवासला विधानसभा भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष विशाल उभे, भाजप नेते उमेशभाऊ सरपाटील तसेच अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

# महात्मा गांधी विद्यालयात विज्ञान, चित्रकला व रांगोळी प्रदर्शन

**खानापूर-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयात संस्थेचे जेष्ठ सदस्य व भारताचे माजी कृषीमंत्री पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विज्ञान,रांगोळी व चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.प्रदर्शनाचे उदघाटन खानापूर चे माजी सरपंच शरद जावळकर,खडकवासला युवक राष्ट्रवादी काँग्रेस ग्रामीण चे अध्यक्ष शशीकांत किवळे,माजी विद्यार्थी





लक्ष्मण माताळे,संस्था अधिक्षक सिताराम अभंग,विशेष कार्यकारी अधिकारी प्रमोद जाधव,गो-हे केंद्र प्रमुख बांदल मॅडम,प्राचार्य शिवराम साबळे,माजी शिक्षक शशिकांत जाधव यांचे हस्ते संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी विज्ञान,चित्रकला व रांगोळी च्या माध्यमातून वैज्ञानिक, सामाजिक,ऐतिहासिक,सांस्कृतिक, शैक्षणिक विषयाची सुंदर मांडणी केल्याबद्दल मान्यवर पाहुण्यांनी विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेत्तर सहका-यांचे अभिनंदन व कौतुक केले.शरदचंद्र पवार यांनी देशासाठी दिलेले योगदान अन्यसाधारण आहे असे उपस्थित मान्यवर म्हणाले. प्रदर्शनास संजय जावळकर (माजी पं.समिती सदस्य),मारुती किंडरे,रघुनाथ यादव,नलावडे सर(संस्था कार्यालय),गर्जे सर (संस्था कार्यालय) या मान्यवरांनी भेट दिली.प्रदर्शनाचे आयोजन व नियोजन प्राचार्य शिवराम साबळे यांचे मार्गदर्शनाखाली भगवान मदने,नूतन ओतुरकर,अपर्णा आढाव,सुजाता भोसले,डॉ. कीर्ती जाधव,मीरा कदम, विजय सुरवसे,भिमाजी हिंगे, सोमनाथ जाधव,रमेश कोळी,शितल सुकाळे,मानसी मोरे,नीलम सुरवसे,संजय थोरवे,राणी धावडे, लोणकर,मोकाशी,मोरे,भापकर,जेष्ठ लेखनिक रायबा कुंभार,अशोक जावळकर,ग्रंथपाल उज्वला शिंदे,तसेच प्रकाश रोकडे,संतोष पंडीत,रुपाली जावळकर आदी शिक्षक- शिक्षकेत्तर सहकारी व विद्यार्थ्यांनी केले.प्रदर्शनास ग्रामस्थ व पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




### कियाकडून ग्लोबल प्रीमियरमध्ये ऑल-न्यू सेल्टोस लाँच

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : मोठे आकारमान, सुधारित सुरक्षितता आणि अत्याधुनिक नाविन्यतेसह एसयूव्ही नेतृत्वाला अधिक प्रबळ करणारे लक्षवेधक उत्पादन वितरित करण्याप्रती आपल्या कटिबद्धतेशी बांधील राहत किया इंडियाने आज ऑल-न्यू किया सेल्टोसचे अनावरण केले, ज्यासह विभागामधील बेंचमार्क-सेटरचे पुनरागमन झाले आहे. भारतातील सर्वात लोकप्रिय एसयूव्ही सेल्टोसमध्ये आकर्षक नवीन स्टाइल, प्रीमियम इंटीरिअर्स, तसेच ग्राहकांच्या विविध गरजांची पूर्तता करणारे वैविध्यपूर्ण ट्रिम्स आणि पॉवरट्रेन्स आहेत. देशभरात बुकिंग्जना 11 डिसेंबर मध्यरात्रीपासून सुरूवात होईल, ज्यासह ग्राहक 25,000 रूपयांच्या सुरूवातीच्या रकमेसह त्यांच्या पसंतीची व आवडती एसयूव्ही रिझर्व्ह करू शकतील. या घोषणेबाबत मत व्यक्त करत किया इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ग्वांगू ली म्हणाले, ऑल-न्यू सेल्टोस जनरेशन बदलापेक्षा अधिक असून त्यामधून श्रेणीला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी कियाचा उद्देश दिसून येतो.



### सुनिधी चौहान यांना सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२५ प्रदान

पुणे (आरंभ पर्व) : जागतिक कीर्तीच्या पार्श्वगायिका सुनिधी चौहान यांना सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. सुनिधी चौहान एका कार्यक्रमासाठी पुण्यात आल्या असताना त्यांची भेट घेऊन 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या हस्ते सुनिधी चौहान यांना गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र, सूर्यदत्तचा स्कार्फ असे पुरस्काराचे स्वरूप होते. संगीत, गायन क्षेत्रांतील भरीव योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. प्रसंगी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा आदी उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर सुनिधी चौहान यांनी संस्थेचे आभार मानत आनंद व्यक्त केला.प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "गेल्या दोन दशकांपासून सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनने विज्ञान-तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र, भारतीय चित्रपटसृष्टी, परफॉर्मिंग आर्ट्स, शिक्षण, क्रीडा आणि अशा विविध क्षेत्रांतील जागतिक स्तरावर कार्यरत अनेक मान्यवरांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' देऊन गौरवले आहे. राष्ट्राच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या आणि नवे मानदंड निर्माण करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करून विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवण्याचा, तसेच सामाजिक उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न सूर्यदत्त नेहमीच करत आहे.""जागतिक कीर्तीच्या कलाकार असलेल्या सुनिधी चौहान यांना पुरस्कार प्रदान केल्याने पुरस्काराची उंची वाढली आहे. चौहान यांनी संस्थेत येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधावा, असे निमंत्रण 'सूर्यदत्त'च्या वतीने दिले असून, त्याला सुनिधी यांनी येण्याचे आश्वासन दिले आहे. मुलांना प्रेरणा मिळावी, त्यांच्या आदर्श व्यक्तिमत्वाना ऐकता यावे, यासाठी 'सूर्यदत्त' नेहमीच नामवंत व्यक्तींना संस्थेमध्ये बोलावत असते,असेही त्यांनी नमूद केले.

# वृत्तपत्रांची धार कुठे हरवली?

## सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याची ताकदच मूकी

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**



(दै. आरंभ पर्व)

लोकशाहीच्या चौकटीत वृत्तपत्रांना चौथा स्तंभ मानले जाते, कारण ते नागरिकांच्या वतीने सत्ता आणि सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारतात. शासनव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याचे, उत्तरदायित्व निर्माण करण्याचे आणि चुकीच्या निर्णयांना उजेडात आणण्याचे सामर्थ्य वृत्तपत्रांच्या लेखणीमध्ये असते. पण गेल्या काही काळात एक चिंताजनक प्रवृत्ती दिसू लागली आहे—अनेक वृत्तपत्रे सत्ताधाऱ्यांच्या जवळ जात आहेत, त्यांच्या बाजूने उभी राहत आहेत, तर लोकांच्या प्रश्नांना, लोकहिताच्या मुद्द्यांना मागे ढकलले जात आहे.

ही परिस्थिती धोकादायक आहे, कारण लोकशाहीचे स्वातंत्र्य फक्त मतदानपुरते मर्यादित नसून मत तयार करणाऱ्या आणि प्रश्न उपस्थित करणाऱ्या माध्यमांच्या सशक्ततेवरही अवलंबून आहे. जेव्हा वृत्तपत्रे सत्तेच्या दिशेने झुकू लागतात, तेव्हा बातमीचे केंद्रबिंदू बदलतात. जनतेच्या समस्या दुय्यम ठरतात आणि सत्ताधाऱ्यांची प्रतिमा सुधारण्याचे काम अधिक महत्त्वाचे ठरते. लोकांना माहिती मिळते, परंतु त्या माहितीची धार, तिची सत्यता आणि तिच्या मागील उद्देश याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होतात.

वृत्तपत्रांचा इतिहास पाहिला तर देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातून आजवर अनेक वृत्तपत्रांनी सत्तेच्या विरोधात उभे राहून आंदोलने पेटवली, जनमत घडवले, विसंगतींना आव्हान दिले. पत्रकारांची लेखणी ही दबाव तंत्र नसून समाजाची जागृती होती. त्या लेखणीत नैतिकता होती, निर्भीडपणा होता. आजही अनेक पत्रकार हेच काम प्रामाणिकपणे करताना दिसतात, परंतु त्या संख्येची तुलनेत घट झाल्याचे विसरता येत नाही.

अनेक वृत्तपत्रे आता मोठ्या उद्योगांच्या मालकीची आहेत किंवा राजकीय व आर्थिक स्वार्थांनी जोडली गेली आहेत. जाहिरातींवरील अवलंबित्व वाढल्याने संपादकीय स्वतंत्रता कमी होत आहे. विरोधी आवाजांचा आवाज दाबला जातो, तर सत्ताधाऱ्यांच्या भूमिकांना अधिक जागा दिली जाते. ही एक प्रकारची एकतर्फी माहितीप्रणाली बनते, ज्यात सामान्य नागरिकाला सत्याचे संपूर्ण चित्र दिसत नाही. प्रश्न विचारणे म्हणजे विरोध नव्हे; प्रश्न विचारणे हे लोकशाहीचे संरक्षण आहे. पण जेव्हा प्रश्न विचारणाऱ्या वृत्तपत्रांवरच दबाव वाढतो, त्यांचा उत्पन्नमार्ग रोखला जातो किंवा त्यांच्यावर कारवाईची भीती दाखवली जाते, तेव्हा स्वातंत्र्याचा मूलभूत पाया हादरू लागतो.

खरे तर, वृत्तपत्रांची ताकद ही सत्ताधाऱ्यांच्या जवळ जाण्यात नसते; ती सत्ताधाऱ्यांना आरसा दाखवण्यात असते. शासनाच्या चुका दाखवणे हा राजद्रोह नसतो, तर लोकशाहीविषयीची प्रामाणिक बांधिलकी असते. सत्ताधारी बदलत जातात, पण वृत्तपत्रांची नैतिकता ही कायम असली पाहिजे. हे माध्यम समाजाचे डोळे आहेत; आणि डोळे जर फक्त हवे तेच दाखवू लागले, तर संपूर्ण समाज दिशाभूल होतो.

आज पुन्हा एकदा वृत्तपत्रांनी धैर्याची ताकद परत मिळवण्याची गरज आहे. सत्तेवर प्रश्न विचारणारा आवाज निर्भय असावा, सार्वजनिक हिताला प्राधान्य देणारा असावा, आणि सत्याच्या बाजूने ठाम उभा राहणारा असावा. लोकशाहीला मजबूत करायचे असेल, तर वृत्तपत्रांची लेखणी धारदार असली पाहिजे—कारण निर्भीड पत्रकारिता हीच कोणत्याही सत्तेला पारदर्शक ठेवणारी सर्वात प्रभावी शक्ती आहे.

## साली मोहब्बतच्या स्क्रीनिंगसाठी कलाकार उपस्थित




मुंबई (दै. आरंभ पर्व)

ZEE5 ची घट्ट खिळवून ठेवणारी नवीन रोमांचक कथा साली मोहब्बत आता स्ट्रीम केली जात आहे आणि यापूर्वीच ती चर्चेचा विषय होती. टिस्का चोप्राने याचे दिग्दर्शन केले असून या चित्रपटात नाट्य, फसवणूक आणि गुंतवळ्यात सापडलेल्या नात्यांचा मिलाफ पहायला मिळत आहे. राधिका आपटे व दिव्येंदू यांच्या प्रभावी अभिनयाने त्यात रंगत भरली आहे. रिलीजच्या आधी, ZEE5 ने मुंबईत एका-मागे-एक अशा खास स्क्रिनिंग्ज आयोजित केल्या असून इंडस्ट्री मधील काही दिग्गज कलाकार त्यात सामील होते. या कार्यक्रमाला निर्माते - मनीष मल्होत्रा, त्यातील कलाकार- राधिका आपटे, दिव्येंदू, अंशुमान पुष्कर, सौरसेनी मैत्रा आणि दिग्दर्शनात पदार्पण करणाऱ्या टिस्का चोप्रा, हे सर्वजण उपस्थित होते. सोबतच करण जोहर, काजोल, भूमी पेडणेकर, फराह खान, उर्मिला मातोंडकर, नशरत भरुचा, रासिका दुग्गल, अभिषेक बॅनर्जी, वरुण शर्मा, हीना खान, करण टॅकर आणि इतर जबरदस्त कलाकार मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते. स्क्रीनिंग्जना भरभरून प्रशंसा मिळाली आणि पाहुण्यांनी चित्रपटाची कुशाग्र कथा सांगण्याची शैली, बारकाईपूर्वक केलेले दिग्दर्शन आणि लक्षवेधक अभिनयाची स्तुती केली. या प्रचंड भावनिक रोमांचक कथेभोवती निर्माण होणारी उत्सुकता, या उद्योगाने दिलेल्या स्नेहपूर्ण प्रतिसादामुळे वाढलेली दिसून येते. काजोलने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर जाऊन चित्रपटाबद्दल आपली समीक्षा सर्वांना कळविली. तिने चित्रपटाचे कौतुक करत लिहिले की, "किती छान मजेदार गूढ रोमांचक कथा आहे ही! नक्कीच पाहिली पाहिजे. पूर्ण टीमचे आणि विशेषत: अतिशय उत्कृष्ट कामगिरीसाठी @radhikaofficial चे खूपखूप अभिनंदन."




M|O|C कॅन्सर केअर सेंटरद्वारे आयोजित

## ONCO 3Sixty २०२५ या राष्ट्रीय ऑन्कोलॉजी परिषदेचे उद्‌घाटन

पुणे (दै. आरंभ पर्व)

M|O|C कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटरने वेस्टिन, पुणे येथे १२-१४ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ONCO 3Sixty २०२५ या आपल्या पहिल्याच प्रमुख राष्ट्रीय ऑन्कोलॉजी परिषदेचे उद्‌घाटन केले. ही तीन दिवसीय परिषद भारताचा सर्वाधिक प्रभावशाली वैज्ञानिक मंच बनू पाहत आहे, जिथे देशभरातील अग्रगण्य चिकित्सक, संशोधक व इनोव्हेटर्स एकत्र जमणार आहेत. उच्च स्तरीय संवाद, अर्थपूर्ण बातचित व अत्यंत आधुनिक ज्ञानाची देवाणघेवाण यांना चालना देण्याच्या हेतूने आखण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये भारतातील कर्करोगाच्या देखभालीच्या भविष्यावर प्रभाव टाकू शकेल, अशा चर्चा आकारास येत आहेत.

ONCO 3Sixty २०२५ मध्ये २०२२ हून अधिक राष्ट्रीय स्तरावरील, कर्करोगाच्या विविध अभ्यासशाखांमध्ये कार्यरत असलेल्या ऑन्कोलॉजिस्ट्सना पाहुणे म्हणून बोलावण्यात आले आहे व या परिषदेत रुग्णांच्या उदाहरणांवरील संवादात्मक चर्चा तसेच परखड वैज्ञानिक वादविवादांचा समावेश असणार आहे. जागतिक प्रतिनिधीत्वाची बाजू अधिक प्रबळ करत या परिषदेमध्ये आठ प्रतिथयश ऑन्कोलॉजी लीडर्सचे स्वागत करण्यात आले, ज्यांच्या उपस्थितीमुळे वैज्ञानिक चर्चांना अधिक खोली व जागतिक दृष्टिकोन मिळत आहे. प्रिसिशन ऑन्कोलॉजी, टार्गेटेड थेरपीज, मॉलेक्युलर ऑन्कोलॉजी, थोरॅसिक ऑन्कोलॉजी आणि प्रगत उपचारात्मक धोरणे या विषयांतील त्यांचे तज्ज्ञत्व चिकित्सकांना या क्षेत्रात जागतिक स्तरावर होणाऱ्या सुधारणांचा मागोवा घेण्यास तसेच या नव्या संकल्पना भारतीय संदर्भात प्रभावीपणे कशाप्रकारे वापरता येतील हे समजून घेण्यास मदत करत आहे.

मान्यवर आंतरराष्ट्रीय विषयतज्ज्ञांमध्ये मॅकारी युनिव्हर्सिटी हॉस्पिटलचे डॉ. ॲलिसन झँग व युनिव्हर्सिटी ऑफ पिट्सबर्ग स्कूल ऑफ मेडिसीनचे डॉ. ॲडम ब्रफ्स्की यांचा समावेश आहे.

## मरण स्वस्त झालंय...! किड्यामुंग्यांसारखी माणसं मरतायत, आणि प्रशासन शांत उभं!

**लक्ष्मण साबळे : निवासी संपादक**



(दै. आरंभ पर्व)

आज परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की मन हेलावून जातं. रस्त्यांवरील जड वाहतूक, भरधाव धावणारी वाहनं, रोजचे अपघात... आणि बिबट्यांचा उच्छाद. सामान्य माणसाचा जीव काहीच किंमतीचा राहिलेला नाही. प्रत्येक दिवसागणिक प्रश्न अधिकच बोचतो-मरण इतकं स्वस्त कधी झालं?

बार्शी तालुक्यातील वैरागमध्ये घडलेली दुर्घटना तर अंतःकरणाला भेदून गेली.

लहानसा चिमुकला आणि त्याचे आजोबा, दवाखान्यातून औषध घेऊन शांतपणे घरी परतत होते. पण चौकातून भरधाव वेगाने येणाऱ्या डंपरने क्षणात त्या दोघांचं आयुष्य संपवलं. एका क्षणात दोन जीव गेले... दोन संसार उद्‌ध्वस्त झाले.

त्या चिमुकल्याचा फोटो, त्याच्या कुटुंबाचं भेसूर शांत झालेलं घर... हे विचारताच अंगावर काटा येतो.

माझ्यातला "बाप" माणूसही हे ऐकून भारावून गेला.

त्या परिवाराची अवस्था कशी असेल? औषध घेऊन घरी परतणारा मुलगा घरी पोहोचण्यापूर्वीच देवाघरी निघून गेला... याहून मोठं दु:ख शब्दांत मांडता येत नाही. मोठमोठे निधी घेऊन रस्ते बनतात, उद्‌घाटने होतात... पण त्या रस्त्यांवरच माणसं मुंग्यांसारखी चिरडली जात असताना प्रशासन मात्र निवांत उभं. जड वाहनांना विनाकारण परवानगी, चौकांमध्ये नियंत्रण नाही, वाहतूक शिस्त नाही मग अशा अपघातांना जबाबदार कोण?


त्यातही जखमी आजोबांना वेळेत उपचार मिळू शकले नाहीत. रुग्णवाहिका वेळेत आली असती, आरोग्य विभाग जागा असता, तर कदाचित एक तरी जीव वाचला असता. ही व्यवस्था फक्त अपघातांनी नाही, तर निष्काळजीपणानेही जीव घेत आहे.

जनतेच्या मनात आता प्रश्न निर्माण होत आहेत- हे असंच चालणार का? लोकांचे जीव वाचवण्यासाठी प्रशासन कधी जागं होणार? की माणसं मरत राहणं हीच शासनाची शांत स्वीकृती आहे? जीव परत येत नाहीत... पण जीव वाचवण्यासाठी पावलं उचलता येतात. आता तरी प्रशासनाने कठोर निर्णय घ्यायलाच हवेत. जड वाहनांवर नियंत्रण, धोकादायक चौकांची सुधारणा, तातडीची वैद्यकीय सुविधा, आणि वाहतूक शिस्त. या दु:खातून गेलेल्या परिवाराला तात्काळ शासनाकडून मदत मिळायलाच हवी.हे फक्त सहानुभूतीचे शब्द नाहीत ही समाजाची जबाबदारी आहे. किमान आता तरी... निरपराधांचे जीव सुरक्षित राहू देत.

वाहनांच्या वेगावर नियंत्रण यायला हवं. मात्र त्याबरोबरच जड वाहतूक असो की इतर काही त्यावर प्रशासनाने निर्बंध आणून या भागातील तसेच उर्वरित भागातही अपवाद टाळण्यासाठी प्रयत्न करायला हवे... किमान परिवार व नागरिक तरी सुरक्षित राहतील.

# प्रभाग क्रमांक ३४ ला विकसित करण्यासाठी कटिबद्ध : सौ. कोमल सतीश कुटे

## प्रभाग ३४ साठी भाजपकडून सौ. कोमल सतीश कुटे इच्छुक



(दै. आरंभ पर्व)

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने दैनिक आरंभपर्वने "मिशन महानगरपालिका "हे वृत्त सदर सुरू केले आहे. सदरामध्ये प्रभाग क्रमांक ३४ बद्दल माहिती जाणून घेण्यासाठी आमचा संवाद भाजप इच्छुक उमेदवार सौ. कोमल सतीश कुटे यांच्याशी झाला. या संवादात त्यांनी प्रभागातील समस्या, आतापर्यंत केलेली सामाजिक कामे, तसेच भविष्यात करायच्या विकास योजनांबद्दल साध्या आणि स्पष्ट शब्दांत माहिती दिली.

कोमलताईंनी सांगितले की प्रभाग ३४ हा त्यांच्यासाठी फक्त राजकीय कार्यक्षेत्र नाही, तर येथे राहणारे लोक म्हणजे त्यांचे मोठे कुटुंब आहे. गेल्या काही काळात त्यांनी महिलांसाठी उपक्रम, आरोग्य शिबिरे, पर्यावरण मोहिमा, स्वच्छता उपक्रम आणि नागरिकांशी सतत संपर्क ठेवण्याचे काम केले आहे. विविध ठिकाणच्या रस्त्यांच्या तक्रारी, पाणीपुरवठ्याच्या अडचणी आणि सार्वजनिक सुविधांबद्दल मिळणाऱ्या सूचना या त्यांनी संबंधित विभागांपर्यंत पोहोचवून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत.

त्यांनी प्रभागासाठी पुढे करावयाच्या कामांचीही माहिती दिली. त्या म्हणाल्या "प्रभाग ३४ ला विकसित करण्यासाठी सर्वप्रथम रस्ते, पाणी, स्वच्छता आणि सुरक्षा या मूलभूत गरजांवर काम करणार आहे."

याशिवाय त्यांनी महिलांसाठी रोजगार प्रशिक्षण, तरुणांसाठी क्रीडा सुविधा व मार्गदर्शन, मुलांसाठी सुरक्षित उद्याने आणि ज्येष्ठांसाठी आरोग्य सुविधा वाढवण्याची गरज व्यक्त केली.कोमलताईंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेचा उल्लेख करत सांगितले "मोदीजी जसा देश विकसित करण्याचे स्वप्न पाहतात, तसाच मी 'विकसित प्रभाग ३४' घडवण्याचा निर्धार केला आहे." तसेच त्यांनी स्पष्ट केले की आमदार भीमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील कामांना अधिक वेग येईल.

त्या म्हणाल्या— "आ.भिमराव अण्णा तापकीर अनुभव आणि विकासकामातील जाण आमच्यासाठी मोठी ताकद ठरणार आहे."

झालेल्या संवादात त्यांनी प्रत्येक प्रश्न मनापासून ऐकला आणि प्रभागाच्या विकासासाठी सतत प्रयत्न करणार असल्याचा विश्वास दिला.

एकूणच, केलेली सामाजिक कामे, स्पष्ट दृष्टी आणि प्रामाणिक संवाद यामुळे कोमल सतीश कुटे या प्रभाग ३४ च्या विकासासाठी एक सक्षम व कटिबद्ध नेतृत्व म्हणून समोर येत आहेत.

भारतीय जनता पार्टी आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी त्यांना उमेदवारी देणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सॅमसंगकडून नवीन नाविन्यता दृष्टिकोनाचे अनावरण

गुरूग्राम (दै. आरंभ पर्व)

सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज नवीन धोरणात्मक दृष्टिकोन #PoweringIn novationforIndia चे अनावरण केले, जो देशातील ब्रँडच्या विकासाच्या पुढील टप्प्यामध्ये ग्राहक-केंद्रित नाविन्यता, भारतीय टॅलेंट आणि भारत-नेतृत्वित उत्पादन विकासाला प्राधान्य देतो. भारतातील कार्यसंचालनांच्या 30 वर्षांना साजरे करत सॅमसंगचा नवीन दृष्टिकोन भारतातील डिजिटल परिवर्तन, मेक इन इंडिया उत्पादन महत्त्वाकांक्षा आणि नाविन्यता-संचालित आर्थिक विकासामधील दीर्घकालीन सहयोगी म्हणून त्यांची कटिबद्धता अधिक प्रबळ करतो. 1995 मध्ये भारतात प्रवेश केल्यापासून सॅमसंगने घरगुती मनोरंजनाला नव्या उंचीवर नेलेले टेलिव्हिजन्स लाँच करण्यापासून नोएडामध्ये जगातील सर्वात मोठे मोबाइल उत्पादन प्लांट स्थापित करण्यामध्ये विस्तार केला आहे, तसेच भारतात डिझाइन केल्या जाणाऱ्या नाविन्यतांना चालना देत आहे, जे आता त्यांच्या जागतिक परिसंस्थेला पाठिंबा देतात.

## प्रभाग ३४ मधील नागरिकांचा विश्वास माझी ताकद : पोपटराव खेडेकर

- माजी आदर्श सरपंच पोपटराव खेडेकर महानगरपालिकेच्या रणांगणात उतरणारा!



(दै. आरंभ पर्व)

प्रभाग क्रमांक 34 मधील नागरिकांनी दाखवलेला प्रचंड विश्वास आणि निस्सीम साथ हीच माझी सर्वात मोठी शक्ती आहे. या विश्वासाच्या बळावर मी पुणे महानगरपालिकेत निश्चितपणे पोहोचेल, असा ठाम निर्धार नऱ्हेगावचे माजी आदर्श सरपंच पोपटराव खेडेकर यांनी दैनिक आरंभपर्वच्या 'मिशन महानगरपालिका' सदरामध्ये संवाद साधताना व्यक्त केला.

खेडेकर पुढे म्हणाले की, सरपंचपदाच्या काळात नरेगावच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम केले. गावातील सर्व अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाइन, वीज सुविधा या मूलभूत कामांमध्ये ग्रामपंचायतीमार्फत भरीव बदल घडवून आणले. तसेच हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक क्षेत्रांसाठी वेळोवेळी प्रशासनाशी समन्वय साधून मदत केली. "नरेगावचा बदल हा एकट्याचा नव्हे, तर जनतेचा आणि माझ्या कार्यपद्धतीवरील त्यांचा विश्वास यांचा मिळून झालेला परिणाम आहे. नागरिकांकडून मिळालेले कौतुक हेच माझे सर्वात मोठे यश," असे ते म्हणाले.

नऱ्हे–धायरी–वडगाव परिसर वेगाने विस्तारत असताना येथील सुविधा मात्र अपुऱ्या असल्याची खंत खेडेकरांनी व्यक्त केली. "या भागात क्रीडांगणांची कमतरता आहे, बसस्टॉपची व्यवस्था नाही, स्वच्छतागृहांची परिस्थिती चिंताजनक आहे. माता-भगिनींना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण निर्माण करण्यासाठी मी स्वतंत्र योजना राबवणार आहे. युवांसाठी क्रीडासुविधा, वरिष्ठ नागरिकांसाठी आरामदायी जागा व मुलांसाठी मनोरंजनाची केंद्रे उभारणे माझ्या प्राधान्यक्रमात असेल," असे त्यांनी सांगितले.

निवडणुकीत उभे राहण्याचा निर्णय बाबत बोलताना खेडेकर म्हणाले, "स्थानिक नागरिकांनीच 'तात्या तुम्हीच उभे राहा' अशी मागणी केली. जनतेचा आवाज हाच माझा आदेश. त्यामुळेच मी या निवडणुकीत रिंगणात उतरलो आहे."

पोपटराव खेडेकर हे नरेगावातील प्रस्थापित व विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जातात. आता महानगरपालिका निवडणुकीत ते किती प्रभाव निर्माण करतात, हे पाहण्यासाठी प्रभाग 34 मधील नागरिक उत्सुक आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे या प्रभागातील निवडणूक अधिक रंगतदार होणार हे निश्चित आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### महाराजा यशवंतराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त टपाल पाकीटाचे अनावरण

• भारतीय डाक विभागाचा उपक्रम

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : महाराजा यशवंतराव होळकर यांचे जन्मगाव वाफगाव येथे होळकर किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाने मोठ्या प्रमाणात निधी दिल्याने किल्ला परिसराचे सुधारणा काम प्रगतीपथावर आहे, ही वास्तू ऐतिहासिक पर्यटन स्थळ होणार असल्याने होळकर किल्ल्याचे नाव जगाच्या पाठीवर झळकणार आहे. असे प्रतिपादन भाजपाचे राज्य सचिव नवनाथ पडळकर यांनी केले. वाफगाव ( ता.खेड ) येथील होळकर किल्ल्यात महाराजा यशवंतराव होळकर यांचा २५० वा जयंती सोहळा संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी भारतीय डाक विभागाच्या वतीने महाराजा यशवंतराव होळकर यांच्या विशेष टपाल पाकीटाचे अनावरण करण्यात आले. यावेळी व्यासपिठावर अनावरण प्रायोजक व अहिल्यारत्न फौंडेशनचे अध्यक्ष विक्रांत काळे, भारतीय पोस्ट पुणे विभागाचे सहाय्यक पोस्टमास्तर जनरल ए. जी. पाखरे, सुप्रिटेंडन्ट ऑफ पोस्ट ऑफिसेस पुणे ग्रामीण विभागाचे डी. व्ही. सर्जेराव, समितीचे अध्यक्ष योगेशराजे होळकर, सचिव योगेश काळे उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, होळकर किल्याबरोबर वाफगाव परिसराचा विकास होणे देखील महत्त्वाचे आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री अजित पवार यांच्या कडे वाढीव निधीची मागणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



### उद्दीपन तर्फे दोन दिवसीय भव्य करिअर कॉन्क्लेव्ह चे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : कौशल्य विकास आणि रोजगार निर्मितीसाठी व्यासपीठ असलेल्या उद्दीपन तर्फे पुणे इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (पीआयबीएम) येथे दोन दिवसीय भव्य करिअर कॉन्क्लेव्ह चे आयोजन 11 व 12 डिसेंबर रोजी करण्यात आले होते. रमणबाईट प्रा.लि. आणि एआयसीटीई च्या सहकार्याने आयोजित या उपक्रमात पुणे जिल्हा व महाराष्ट्रातून प्रतिभावान विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील कंपन्या एकाच व्यासपीठावर आल्या. उद्दीपन हे एक राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकास आणि रोजगार निर्मिती व्यासपीठ असून रमणबाईट प्रा.लि.ने हे विकसित केले आहे.याला एआयसीटीई चे समर्थन असून याचा उद्देश शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध उद्योगांमध्ये रोजगार व इंटर्नशिप्स मिळवून देणे हे आहे. या भव्य करिअर कॉन्क्लेव्हमध्ये अभियांत्रिकी,वाणिज्य,विज्ञान,कला व व्यवस्थापन अशा विविध शाखेतील 2500 हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला,तर अनेक मोठ्या कंपन्या लघु व मध्यम उद्योग,स्टार्टअप्स यांनी यात सहभाग नोंदवला.त्यामध्ये बँकींग व वित्तीय सेवा, फिनटेक,आयटी व आयटीईएस, रिअल इस्टेट, एडटेक, कन्सल्टींग, इंजिनिअरींग, मॅन्युफॅक्चरींग, ऑटोमोटिव्ह, रिटेल,ई-कॉमर्स,हॉस्पिटॅलिटी व प्रोफेशनल सर्व्हिसेस इत्यादी उद्योगांचा समावेश होता. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना सेल्स ॲन्ड मार्केटिंग,बिझनेस डेव्हलपमेंट,कस्टमर सपोर्ट,ऑपरेशन्स,ग्रॅज्युएट इंजिनिअर ट्रेनी,डिप्लोमा इंजिनिअर ट्रेनी,डिझाईन इंजिनिअर्स,साईट इंजिनिअर्स,प्रॉडक्शन इंजिनिअर्स,क्वालिटी इंजिनिअर्स,अकाऊंटस एक्झिक्युटिव्ह,फायनान्स असोसिएटस अशा अनेक जॉबरोल्स साठी संधी मिळाली.नवीन संधींमध्ये ऑटोकॅड स्पेशालिस्ट,एस्टिमेशन इंजिनिअर,क्युसी केमिस्ट व एचव्हीएसी/टेक्निकल सर्व्हिसेस यांनी लक्ष वेधून घेतले.

### अद्ययावत ऑर्थोकेअर सुविधेचे व एआय इनोव्हेशन लॅबचे अनावरण

पुणे (आरंभ पर्व) : भारतात आर्थोपेडिक केअर मध्ये सर्वांत विश्वसनीय संस्थांपैकी एक असलेल्या संचेती हॉस्पिटलची 60 वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्ताने भविष्यकेंद्रित उपक्रमांची घोषणा करण्यात आली.त्यामध्ये अद्ययावत ऑर्थोकेअर सुविधा,एआय इनोव्हेशन लॅब,एआय चलित डायग्नोस्टिक्स व रिहॅबिलिटेशन सुविधेमध्ये विस्तार,गरजू रुग्णांपर्यंत पोहचण्यासाठी मोबाईल ऑर्थोकेअर युनिटस आणि एआय ने प्रेरित सॅनबो मॅस्कॉटचे अनावरण या सर्व उपक्रमांचा समावेश आहे. पद्मश्री,पद्मभूषण व पद्मविभूषण डॉ.के.एस.संचेती यांनी या संस्थेची स्थापना 12 डिसेंबर 1965 ला केली. 10 बेडसच्या छोट्या रूग्णालयापासून ते दरवर्षी लाखो रुग्णांवर उपचार करण्याच्या क्षमतेपर्यंत रूग्णालयाने प्रवास केला आहे.

# "टीम ऑफ अजितदादा" तर्फे खेळ रंगला पैठणीचा उत्साहात

## महिला भगिनींनी तणावमुक्त जीवन जगणे काळाची गरज : चाकणकर







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३३ "शिवणे-खडकवासला-धायरी" अंतर्गत धायरी, खडकवासला, कोल्हेवाडी, जे.पी. नगर, नांदोशी-सणसवाडी, किरकटवाडी, नांदेड, कोंढवे, कोपरे, उत्तमनगर व शिवणे परिसरातील महिलांसाठी खास "खेळ रंगला पैठणीचा" आणि भव्य लकी ड्रॉ कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

उत्तम नगर परिसरात झालेल्या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसरात आनंदी आणि सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते. घरकाम, नोकरी आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त असलेल्या महिलांना या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वतःसाठी थोडा वेळ मिळाला. विविध खेळ, मनोरंजन, सुंदर सजावट आणि आकर्षक बक्षिसांमुळे महिलांचा उत्साह दुणावला. पैठणीसारख्या सन्मानचिन्हामुळे अनेक महिलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान स्पष्टपणे दिसत होते. महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. या कार्यक्रमास तब्बल 5000 महिला भगिनीं उपस्थित होत्या..

कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रुपालीताई चाकणकर यांनी विशेष उपस्थिती लावून महिला भगिनींना शुभेच्छा दिल्या. महिलांनी आनंदी, आत्मविश्वासाने आणि निर्धाराने जीवन जगले पाहिजे, यासाठी असे



उपक्रम महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणाऱ्या या उपक्रमाचे त्यांनी मनापासून कौतुक केले. तसेच आगामी काळात महिलांनी एकत्र येऊन टीम अजितदादा अर्थात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (A) खडकवासला विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष श्री. बाबा धुमाळ यांच्यासह राहुल पोकळे, कुणाल पोकळे, भूपेंद्र मोरे, सौ. भागश्री कामठे, सौरभनाना मते, निलेश गिरमे, सागरभाऊ कोल्हे, अविनाश लगड, शुभम गायकवाड, कुमार धूपरगुडे, युवक अध्यक्ष सागर कोल्हे, युवराज वांजळे, विठ्ठल वांजळे, संभाजी वांजळे, किरण वांजळे, सतीश वांजळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच संजय धावडे, गणेश गवाडे, अमोल परांडे, अमोल गुजाळ, स्वप्निल मोकाशी, राहुल घुले, निलेश मोरे, प्रशांत लाढगे, अवि शैलार, प्रविण लाढगे, भुषण दामगुडे, अरुण दागंट, राजेंद्र कोल्हे, दर्शन रायकर, प्रतीक होले यांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रदेश प्रवक्ते राहुल पोकळे, शुक्राचार्य वांजळे, सौरभनाना मते, सायली सागर कोल्हे आणि अविनाश लगड , भाग्यश्रीताई,कामठे,यांनी केले होते. नियोजनबद्ध आणि सुंदर आयोजनामुळे हा कार्यक्रम यशस्वी ठरला. महिलांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि समाधान हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## अंदमान आणि निकोबार येथील विजयापुरम येथे "सागरा प्राण तळमळला" या गीताच्या ११६व्या वर्षपूर्तीनिमित्त भव्य ऐतिहासिक सोहळा

**श्री विजयापुरम, अंदमान आणि निकोबार (दै. आरंभ पर्व)**

"सागरा प्राण तळमळला" या अमर्त्य अशा काव्यपंक्तींनी लाखो भारतीयांच्या हृदयात त्यावेळी राष्ट्रवादाची वात जागवली, या गोष्टीला म्हणजेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी या ज्या पंक्ती समुद्राच्या लाटांच्या साक्षीने लिहिल्या त्या गोष्टीला आज ११६ वर्षे होऊन गेली आहेत. या ऐतिहासिक अशा क्षणाच्या निमित्ताने मुंबई येथील व्हॅल्यूएबल ग्रुपचे संस्थापक श्री अमेय हेटे यांनी "सागरा प्राण तळमळला" या भव्य अशा सोहळ्याचे आयोजन १२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी तीन वाजता अंदमान आणि निकोबार येथील श्री विजयापुरम येथे केले होते. या भव्य अशा सोहळ्यात सावरकरांच्या तेजस्वी आणि भव्य पुतळ्याचे अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूज्य डॉक्टर मोहन भागवत यांच्या हस्ते आणि केंद्रीय गृहमंत्री श्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. माननीय मोहन भागवत आणि माननीय अमित शहा हे हृद्य आणि सार्वजनिक अशा या सोहळ्यात एकत्र आल्याने एक दुर्मिळ योग साध्य झाला. एडमिरल (नि) देवेंद्र कुमार जोशी, माननीय लेफ्टनंट गव्हर्नर, श्री विजयापुरम आनंद अंदमान निकोबार आणि महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲडव्होकेट आशिष शेलार हे यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी व्हॅल्यूएबल ग्रुपचे संस्थापक अमेय हेटे यांचीसुद्धा उपस्थिती होती. हा पुतळा म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रखर राष्ट्रवादाचे, अजोड त्यागाचे आणि निडर विचारसरणीचे प्रतीक आहे. या पुतळ्याची रचना प्रख्यात शिल्पकार श्री राम सुतार यांची आहे. त्यांना नुकतेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या अनोख्या अशा उपक्रमाबद्दल बोलताना व्हॅल्युएबल ग्रुपचे संस्थापक श्री अमेय हेतेहोते म्हणाले," हा सोहळा म्हणजे केवळ एक सांस्कृतिक सोहळा नसून ही भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाला वाहिलेली एक मानवंदना आहे. हा भविष्यातील आपल्या पिढ्यांमध्ये राष्ट्रवाद आणि देशभक्ती जागृत करण्याचा एक प्रामाणिक छोटासा प्रयत्न आहे.

## प्रभाग ३३ : आदर्श प्रभाग बनवण्यासाठी कटिबद्ध

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रबळ उमेदवार : अनिताताई इंगळे

**(दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 33 मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) कडून प्रबळ उमेदवार म्हणून जिल्हा परिषद सदस्या अनिता ताई इंगळे पुढे येत आहेत. मिशन महानगरपालिका या सदरामध्ये त्यांच्याशी संवाद साधला असता, प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.



पंचायत समिती सदस्य ते जिल्हा परिषद सदस्या असा त्यांचा लोकप्रतिनिधित्वाचा प्रवास हा सातत्यपूर्ण कामाचा आणि जनतेशी असलेल्या जवळच्या नात्याचा आहे. ग्रामीण तसेच समाविष्ट गावांमधील समस्या, मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव आणि शहरीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले आहेत. हाच अनुभव पुणे महानगरपालिकेमध्ये नगरसेविका म्हणून काम करताना उपयोगी ठरेल, असे अनिता ताई इंगळे यांनी सांगितले. प्रभाग क्रमांक 33 मधील न्यू कोपरे, कोंढवे धावडे, शिवणे, खडकवासला गाव व परिसरात आतापर्यंत रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, पथदिवे, स्वच्छता तसेच नागरी सुविधांशी संबंधित विविध विकासकामे करण्यात आली आहेत. हीच कामे त्यांच्या कार्याची ओळख बनली असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट निगडित प्रश्नांवर त्यांनी कायम लक्ष दिले आहे. समस्या समजून घेऊन त्यावर पाठपुरावा करणे हीच आपली कार्यपद्धती असल्याचे त्यांनी सांगितले.

संवादादरम्यान अनिता ताई इंगळे यांनी आगामी काळातील विकास आराखड्याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रभागामध्ये नागरिकांसाठी विविध सोयी-सुविधा निर्माण करणे, लहान मुले व युवकांसाठी सुसज्ज क्रीडांगणे उभारणे, महिलांसाठी सुरक्षित व आकर्षक गार्डन विकसित करणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा व आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त ठिकाणे उपलब्ध करून देण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नियोजनबद्ध विकासाच्या माध्यमातून प्रत्येक घटकाला उपयोगी पडतील अशी कामे केली जातील, असेही त्या म्हणाल्या.

महिलांचे आरोग्य, स्वयंरोजगार, बचत गटांना चालना, युवकांसाठी क्रीडा व कौशल्य विकासाच्या संधी, तसेच शिक्षण आणि सार्वजनिक सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करण्यावर आपला भर राहील, असे अनिता ताई इंगळे यांनी नमूद केले. "विकासकामे केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्षात नागरिकांना जाणवली पाहिजेत. प्रत्येकाला आदर्श वाटेल असे काम करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील," असे त्यांनी ठामपणे सांगितले. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरदचंद्र पवार तसेच खासदार सुप्रिया ताई सुळे यांच्या दूरदृष्टीतून आणि मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक 33 ला आदर्श प्रभाग बनवण्याचा आपला संकल्प असल्याचे त्यांनी व्यक्त केले. पारदर्शक कारभार, नागरिकांचा थेट सहभाग आणि सातत्यपूर्ण विकास या त्रिसूत्रीवर आपले कार्य आधारित राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांच्या विश्वास आणि सहकार्याच्या बळावर प्रभाग क्रमांक 33 चा सर्वांगीण विकास साधता येईल, असा आत्मविश्वास व्यक्त करत अनिता ताई इंगळे यांनी आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीत नागरिकांनी आपल्याला साथ द्यावी, असे आवाहन केले.

## व्हीनस ट्रेडर्स व सीटी पुंडोल तर्फे प्रशस्त दालनाचे उद्‌घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समृध्द वारसा असलेल्या पुण्यातील व्हीनस ट्रेडर्स व सीटी पुंडोल तर्फे अलिशान लेखन उपकरणे आणि ॲक्सेसरीज साठी व्हिडोल या प्रशस्त दालनाचे एमजी,रोड येथे उद्‌घाटन करण्यात आले आहे. व्हीनस ट्रेडर्स हे स्टेशनरी, कला साहित्य आणि लेखन उपकरणांसाठी लोकप्रिय ठिकाण आहे,तर सीटी पुंडोल हे लक्झरी घड्याळे,कलाकुसर,कारागिरी आणि प्रिमियम रिटेल अनुभवांसाठी प्रसिध्द असलेले व 117 वर्षांचा समृध्द वारसा असलेला लोकप्रिय ब्रँड आहे. या दालनाच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द भारतीय वास्तुविशारद,शिक्षणतज्ञ प्रा. यशवंत पिटकर याबरोबरच व्हीनस ट्रेडर्स चे सुरेंद्र करमचंदानी,प्रमोद करमचंदानी,निखिल करमचंदानी व सीटी पुंडोलचे कावस पुंडोल, अविवा पुंडोल व होरमुझ पुंडोल आदी मान्यवर उपस्थित होते.

व्हिडोल या दालनाच्या माध्यमातून परंपरा,लक्झरी व आधुनिक अभिजाततेचा शक्तीशाली समन्वय दर्शवण्याचा प्रयत्न आहे.या प्रशस्त दालनात लेखन उपकरणे व ॲक्सेसरीजचे 20 हून अधिक आंतरराष्ट्रीय व प्रिमियम ब्रँडसची उत्पादने असून ग्राहकांना अतुलनीय अनुभव प्रदान करतील. व्हिडोल हे अशा प्रकारचे पुण्यातील पहिले बुटीक कॉन्सेप्ट स्टोअर असून कालातीत कारागिरी आणि लेखनाचा आनंद साजरा करते.

# प्रभाग क्रमांक ३४ साठी सौ. दीपाली जगताप इच्छुक !

### प्रभाग क्रमांक ३४ च्या नागरी विकासासाठी अविरत प्रयत्न करू : सौ. दिपाली जगताप

**(दै. आरंभ पर्व)**

दैनिक आरंभपर्व पुणेच्या मिशन महानगरपालिका या सदरामध्ये प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव-धायरी येथील इच्छुक उमेदवार सौ. दिपाली नंदकुमार जगताप यांच्याशी संवाद साधण्यात आला. यावेळी त्यांनी प्रभागातील समस्या, आतापर्यंत केलेले सामाजिक कार्य तसेच आगामी काळातील विकासाचा आराखडा सविस्तरपणे मांडला.





सौ. दिपाली जगताप म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर प्रेरित होऊन आपण सार्वजनिक जीवनात कार्यरत आहोत. सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, हेच आपल्या कार्याचे केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नऱ्हे-वडगाव-धायरी परिसरात सामाजिक व नागरी कामांमध्ये सौ. दिपाली जगताप यांचा सातत्याने सहभाग राहिला आहे. महिलांसाठी विविध उपक्रम, सामाजिक कार्यक्रम, तसेच नागरिकांच्या समस्या थेट समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या कार्याला पती श्री. नंदकुमार मारुती जगताप यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे.

श्री. नंदकुमार जगताप यांनी वडगाव परिसरातील विविध विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला असून, स्थानिक प्रश्नांसाठी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा तसेच नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणारे ठरले आहेत. त्यांच्या सामाजिक अनुभवाचा लाभ प्रभागाच्या विकासासाठी निश्चितच होईल, असा विश्वास सौ. दिपाली जगताप यांनी व्यक्त केला.

नऱ्हे-धायरी परिसर हा सध्या शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र बनत आहे. विविध शैक्षणिक संस्थांमुळे राज्यभरातून विद्यार्थी येथे वास्तव्यास आले आहेत. मात्र वाढती लोकसंख्या लक्षात घेता रस्ते, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन यासारख्या मूलभूत सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे त्यांनी सांगितले.

या सर्व प्रश्नांवर नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करून काम केले जाईल. महिलांसाठी स्वतंत्र हॉल, बचतगटांना प्रोत्साहन, युवकांसाठी क्रीडांगणे व व्यायामशाळा, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्याने आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

प्रभागातील रस्ते, ड्रेनेज, वाहतूक नियोजन आणि नागरी सुविधांसाठी स्वतंत्र रोड मॅप व ब्लू प्रिंट लवकरच नागरिकांसमोर मांडण्यात येणार असल्याचे सांगत, ही लढाई व्यक्तीची नसून प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी असल्याचे सौ. दिपाली नंदकुमार जगताप यांनी नमूद केले. जनतेच्या विश्वासाने व आशीर्वादाने ही विकासाची लढाई यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

## भारतीय कुटुंबांची पसंती बनली वीवो स्विच ऑफ स्टडी

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

वीवो इंडियाने आज त्यांच्या वार्षिक स्विच ऑफ अहवालाची सातवी आवृत्ती प्रसिद्ध केली, जी पालक-मुलांच्या संबंधांवर स्मार्टफोनचा अतिरेकी वापर कसा परिणाम करत आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करते. या वर्षीच्या आवृत्तीत विवोच्या 'स्विच ऑफ' उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आणखी दृढ केले आहे - लोकांना त्यांच्या स्मार्टफोनशी निरोगी संबंध विकसित करण्यास आणि वास्तविक जीवनातील नातेसंबंधांना प्राधान्य देण्यास प्रोत्साहित करणे. हा अहवाल एका मोठ्या 'स्विच ऑफ' उपक्रमाचा भाग आहे जो प्रियजनांसोबत अधिक वेळ घालवण्याचे महत्त्व अधोरेखित करतो. डिजिटल कनेक्टिव्हिटी दैनंदिन जीवनाचा एक मोठा भाग




बनत असताना कुटुंबे या बदललेल्या डिजिटल वर्तनाशी कसे जुळवून घेत आहेत याचा शोध अहवालात घेतला आहे. अभ्यासातून दोन प्रमुख अंतर्दृष्टी समोर आल्या आहेत: रात्रीच्या जेवणाचा वेळ कुटुंबांसाठी दिवसाचा सर्वोत्तम कनेक्शन क्षण राहिला आहे आणि मुले आता मदतीसाठी एआयकडे वळत आहेत कारण त्यांना वाटते की त्यांचे पालक अनेकदा खूप व्यस्त असतात. अभ्यासातून असे दिसून आले आहे की ७२% मुले रात्रीच्या जेवणाच्या वेळी त्यांच्या पालकांसोबत सर्वाधिक वेळ घालवतात.